किंमत रु. ३०
पृष्ठे ४४



# जीवन शिक्षण

सप्टेंबर २०२०

## शिक्षक भावी पिढीचे भवितव्य घडविणारा शिल्पकार!



ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र

# शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

> मला नेहमी वाटते की, विद्यार्थ्यांचे खरे पाठ्यपुस्तक म्हणजे त्यांचे शिक्षक होय.
>
> *– महात्मा गांधी*

> जो या हृदयीचे त्या हृदयी जुळवून घेतो, बालकांच्या सर्जनाला संवेदनेशी जोडतो तो शिक्षक.
>
> *– रवींद्रनाथ टागोर*

> शिक्षक तो नव्हे जो विद्यार्थ्यांच्या मस्तिष्कात सूत्रे, संज्ञा यांचे रोपण करतो; खरा शिक्षक तो जो विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत भविष्याची दिशा पेरतो.
>
> *– डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन*

> शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षणाचा खरा अर्थ समजावून घेतला आणि तो विचार मानवी सहभागाच्या प्रत्येक क्षेत्रात प्रसारित केला, तर हे जग इथं राहण्यासाठी कितीतरी चांगलं ठिकाण बनेल.
>
> *– डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम*

# जीवन शिक्षण

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

वर्ष ६४ सप्टेंबर २०२० अंक ६ वा


- प्रवर्तक :
  शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन
- प्रकाशक :
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- प्रकाशन सल्लागार समिती :

| | |
|---|---|
| **दिनकर पाटील**<br>*संचालक तथा संपादक* | **अध्यक्ष** |
| **विकास गरड,** *प्र. प्राचार्य* | **सदस्य** |
| **डॉ. कमलादेवी आवटे,**<br>*प्राचार्य, समता विभाग* | **सदस्य** |
| **डॉ. शोभा खंदारे,**<br>*प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे.* | **सदस्य** |
| **श्रीम. अश्विनी मुसळे-काळसर्पे**<br>*सहा. संचालक, लेखा* | **सदस्य** |
| **दत्तात्रय थिटे,** *वरिष्ठ अधिव्याख्याता,*<br>राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. | **सदस्य** |
| **श्रीम. वर्षाराणी भोपळे,** *वरिष्ठ अधिव्याख्याता*<br>राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. | **सदस्य** |

- **निर्मिती सहायक : डॉ. किरण धांडे**
  *वरिष्ठ अधिव्याख्याता, प्रसार माध्यम* **सदस्य-सचिव**
- **मुखपृष्ठ व अंतरंग सजावट :**
  **नूतन क्षीरसागर,** *आर्टिस्ट कम टेक्निशियन*
- **मुद्रक : रुना ग्राफिक्स,** सिंहगड रोड, पुणे ४१.
- **प्रती :** -
- **मूल्य : रु. ३०/-   वार्षिक वर्गणी रु. ३००/-**


## अंतरंग


| | | |
|---|---|---|
| संपादकीय | - | ४ |
| शुभेच्छा संदेश | - | ५ |
| शिक्षण : सहिष्णू समाज निर्मितीचे साधन | प्रशांत डवरे | ९ |
| लॉकडाऊनमधील उपक्रमांचा जागर | डॉ. मंजूषा क्षीरसागर | १२ |
| ऑनलाईन शिक्षणाची दिशा | डॉ. सुचिता पाटेकर | १५ |
| अपनी राजभाषा | राजेंद्र वाकडे | १९ |
| ऑनलाईन शिक्षणाची संधी व आव्हाने | ऊर्मिला हाडेकर | २१ |
| ओट्यावरची शाळा | प्रकाश चव्हाण | २५ |
| ऑनलाईन विज्ञान - जीवनानुभूती | शिल्पा कारंडे | २७ |
| सांगा सांगा बाई सांगाना, कोरोना जाईल का? | विद्याधर शुक्ल | ३० |
| लॉकडाऊनमध्ये ऑनलाईन उपक्रम | नंदिनी धाक्रस | ३१ |
| केल्याने होत आहे रे...! | वैभव जगताप | ३४ |
| जीवनाकरिता व सातत्यपूर्ण विकासासाठी साक्षरता | डॉ. सीमा पुसदकर | ३६ |
| माहितीपत्रक RIMC - (प्रवेश परीक्षा) | | ४० |
| प्रिय संपादक | - | ४२ |



**पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, जीवन शिक्षण,**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
**दूरध्वनी :** ०२०-२४४८८३८२ **फॅक्स नं. :** ०२०-२४४७७०९०. **ई-मेल :** jeevanshikshan@maa.ac.in


*या अंकातील लेखांमधून व्यक्त झालेल्या विचारांशी किंवा मतांशी जीवन शिक्षण संपादकीय मंडळ सहमत असेलच असे नाही.*

# संपादकीय ....



शिक्षक मित्रांनो,

५ सप्टेंबर हा दिवस भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन शिक्षकांना सल्ला देत असत की, 'आपण सदैव बौद्धिक एकात्मता आणि सार्वत्रिक अनुकंपा यांचा पाठपुरावा केला पाहिजे.' खऱ्या गुरूमध्ये ही दोन गुणवैशिष्ट्ये असतात. शिक्षकाने सतत शिकत राहिले पाहिजे (लाइफ लॉंग लर्नर) आणि त्याची व्यवसायाशी निश्चितच बांधिलकी असली पाहिजे. या दोन गोष्टी शिक्षकाने आत्मसात केल्या, तर प्रत्येक विद्यार्थ्याचे भविष्य उज्ज्वल होईल आणि ज्ञानाच्या कक्षा रुंदावत जातील. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने 'बंदिस्त' ज्ञान आज सर्वांसाठी खुले झाले आहे. अशा परिस्थितीत नवनवीन ज्ञान, कौशल्ये आत्मसात करणे आणि ती सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे यासाठी सतत प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे.

शिक्षणाची व्याख्या बदलत असली आणि अनेक प्रकारचे नवनवीन, आधुनिक तंत्रज्ञान शिक्षण क्षेत्रात येऊ घातले असले तरी, शिक्षकांच्या भूमिकेमध्ये आणि कर्तव्यामध्ये बदल होत नसतो. त्यामुळे नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून त्याचा शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कसा उपयोग करता येईल याचा सतत ध्यास घेतला पाहिजे. कोविड–१९ च्या या परिस्थितीमध्ये तंत्रज्ञानाचा कसा उपयोग होत आहे याची जाणीव झाली आहे. तंत्रज्ञान शिक्षकांची जागा घेऊ शकत नसले तरी, सर्व विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी आणि अधिक पटसंख्येच्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या अध्यापनासाठी ते निश्चितच साहाय्यभूत ठरत आहे. एकविसाव्या शतकातील सक्षम पिढी बनविण्यासाठी मॅथेमॅटिकल, कॉम्प्युटराईज्ड, डिझाइन ची विचारसरणी, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ज्ञानाची निर्मिती यांवर भर देण्याची आवश्यकता आहे. ही कौशल्ये शिक्षकांमध्ये असतील, तरच ती विद्यार्थ्यांमध्ये प्रतिबिंबित होतील. एकविसाव्या शतकातील पिढी सक्षम, चारित्र्यसंपन्न आणि विचारसंपन्न होण्यासाठी, विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, परंपरा आणि मूल्ये यांची जोपासना केली पाहिजे. असे झाले तरच एकविसाव्या शतकातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी ते सक्षम नागरिक बनतील. शिक्षक दिनानिमित्त आपण तंत्रस्नेही भूमिका नेहमीच समोर ठेवू या आणि मुलांचे भविष्य उज्ज्वल करू या.

शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**दिनकर पाटील**
संपादक, जीवन शिक्षण

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन



**उद्धव बाळासाहेब ठाकरे**
मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य

# शुभेच्छा संदेश

पाच सप्टेंबर, भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन. हा दिवस शिक्षक दिन म्हणून आपण सर्वजण साजरा करतो. राष्ट्र विकासाच्या प्रक्रियेत उत्तम नागरिक घडविण्यात शिक्षकांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. उन्नत समाज निर्मिती करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणे गरजेचे असते. यात शिक्षकांचे महत्त्व विसरता येणार नाही.

शिक्षकांनी समाजातील सर्व स्तरांतील मुलांपर्यंत दर्जेदार शिक्षण पोहोचवून त्यांची गुणवत्ता उंचाविण्यासाठी कोणत्याही परिस्थितीत कटिबद्ध असणे गरजेचे आहे. मी नेहमी म्हणतो की, शिक्षण सुरू राहिले पाहिजे, मग माध्यम कोणते का असेना. सध्याच्या कठीण परिस्थितीत सुद्धा शाळा बंद असूनही, प्रत्येक मूल शिकावं यासाठी आपण करीत असलेले प्रयत्न निश्चितच प्रशंसनीय आहेत. परिस्थिती कोणतीही असो, महाराष्ट्र राज्याच्या गुणवत्तेचा आलेख असाच चढता ठेवण्यासाठी आपण कटिबद्ध होऊ या. शैक्षणिक गुणवत्तेचे चित्र या ध्यासातून नक्कीच पालटेल असा मला विश्वास आहे.

शिक्षक बंधू-भगिनींना शिक्षक दिनाच्या पुनश्च एकदा शुभेच्छा!

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन



**अजित पवार**
उप मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य

# शुभेच्छा संदेश

देशासाठी सक्षम भावी पिढी घडविण्याचे कार्य करीत असलेल्या राज्यभरातील माझ्या सर्व शिक्षक बंधू–भगिनींना मी शिक्षक दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देतो.

देशाचे माजी राष्ट्रपती, स्वर्गीय डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा ५ सप्टेंबर हा जन्मदिन आपण दरवर्षी शिक्षक दिन म्हणून साजरा करतो. आदरणीय डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना, तसेच आपल्याला घडविणाऱ्या आपल्या शिक्षकांना, माझ्या गुरुजनांना आज शिक्षक दिनाच्या निमित्ताने मी वंदन करतो. आपल्या देशाला, राज्याला गुरू–शिष्य परंपरेचा गौरवशाली वारसा लाभलेला आहे. महात्मा जोतिबा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासारख्या असंख्य ध्येयनिष्ठ गुरुजनांनी राज्यात शिक्षणाचे बीज रोवले. शिक्षणाची गंगा सामान्यांच्या दारापर्यंत नेली. शैक्षणिक क्रांती घडवून आणली. विद्यार्थ्यांच्या कित्येक पिढ्या घडविल्या आणि देशाला बलशाली केले. या ध्येयनिष्ठ महामानवांनी दाखविलेल्या मार्गाने महाराष्ट्राच्या गावखेड्यातल्या, कानाकोपऱ्यातल्या शाळांमध्ये आजही असंख्य शिक्षक बांधवांच्या माध्यमातून अध्यापनाचे सेवा कार्य अखंड सुरू आहे, याचा सर्वांनाच आनंद आणि अभिमान आहे. या समस्त शिक्षक बांधवांचे मी अभिनंदन करतो.

शिक्षक हे राष्ट्रनिर्माते आहेत. ते विद्यार्थी घडविण्याचे कार्य करीत असतात. आपले विद्यार्थी गुणवंत, ज्ञानवंत व्हावेत, त्याबरोबरच ते चारित्र्यसंपन्न असावेत यासाठी त्यांचा प्रयत्न असतो. समर्थ भारताच्या निर्मितीसाठी ही मोठी देशसेवाच शिक्षकांनी केलेली आहे, असे मी मानतो. आपले हे राष्ट्र निर्मितीचे कार्य या पुढच्या काळातही अखंडपणे सुरू राहील, असा मला विश्वास आहे. राज्यभरातील समस्त शिक्षक बांधवांना शिक्षक दिनाच्या मन:पूर्वक शुभेच्छा!

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन



**प्रा. वर्षाताई गायकवाड**
मंत्री, शालेय शिक्षण,
महाराष्ट्र राज्य.

# शुभेच्छा संदेश

राज्यातील शिक्षक बंधू–भगिनींना शिक्षक दिनाच्या मन:पूर्वक शुभेच्छा! देशातील सामाजिक विषमता व आर्थिक दारिद्र्य नष्ट करण्याचे, शिक्षण हे सर्वांत प्रभावी माध्यम आहे. राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाचे महत्त्व जाणून, समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षणाशिवाय पर्याय नसल्याचे अधोरेखित केले आहे. या अनुषंगाने विचार केल्यास शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणात आपण यश मिळविले आहे, पण हेच यश आपणास गुणवत्तेच्या संदर्भातही प्राप्त करून घ्यावयाचे आहे.

सद्य:स्थितीत डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची अखंड ज्ञानसाधनेची वाट आपणही चोखाळण्याची गरज आहे. शिक्षकांच्या ज्ञानसमृद्धतेवर शिक्षण प्रक्रिया समृद्ध होत जाते व त्यातून तितकाच विवेकाधिष्ठित समाज निर्माण होत असतो. विवेकनिष्ठ समाज हा राष्ट्र विकासाचा पाया असतो. तो निर्माण करण्यासाठी आपण सर्व प्रयत्नशील राहू या.

आजवर तुम्ही केलेल्या कार्याने आपण काही प्रमाणात प्रगतीचा आनंद मिळवीत आहोत परंतु हे सत्र मात्र अनेक नवी आव्हाने घेऊन समोर आले आहे. अनिश्चित काळासाठी शाळा बंद आहेत, तरीही आपण विविध माध्यमांतून या आव्हानांना सामोरे जाऊन प्रत्येक मुलाचे शिक्षण सुरू ठेवण्याचा प्रयत्न करीत आहोत. अनेक समस्या समोर असल्या, तरी त्यावर मात करीत आपल्याला प्रगतीचा टप्पा गाठायचा आहे. मला खात्री आहे, आपण सर्व यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा कराल.

शिक्षक बांधवांना शिक्षक दिनाच्या पुन्हा एकदा हार्दिक शुभेच्छा!

# शुभेच्छा संदेश



**वन्दना कृष्णा**
अपर मुख्य सचिव,
शालेय शिक्षण व
क्रीडा विभाग,
मंत्रालय, मुंबई.

५ सप्टेंबर, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन आपण शिक्षक दिन म्हणून साजरा करतो. कोणत्याही देशाच्या प्रगतीचा कणा म्हणजे शिक्षक. सुसंस्कारी पिढी घडविण्याचे काम शिक्षकांनी करावयाचे असते. भारताचा इतिहास गुरू-शिष्य परंपरेचा संस्कार घडविणारा आहे. देशातील प्रत्येक मूल ज्ञानी व्हावे, सुसंस्कृत व्हावे म्हणून शिक्षकांनी आपले कार्य अतिशय प्रामाणिकपणे आणि निरंतर करण्याची गरज असते. या प्रयत्नांतूनच देशाच्या प्रगतीचा पाया अधिकाधिक मजबूत होत राहतो.

मागील काही वर्षांचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, पटनोंदणी करण्यात आपण १०० टक्के यश मिळविले आहे, परंतु गुणवत्तेच्या बाबतीत आपल्याला अजून बराच मोठा पल्ला गाठायचा आहे. त्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. सध्या कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे सर्वत्र शाळा बंद आहेत, पण आपण मात्र विविध माध्यमांतून शिक्षण सुरू ठेवले आहे आणि ते मुलांपर्यंत पोहोचावे म्हणून आपण आटोकाट प्रयत्न करीत आहात. तुम्ही करीत असलेली धडपड नक्कीच कौतुकास्पद आहे. या सर्व वाटचालीसाठी आणि शिक्षक दिनानिमित्त माझ्या तुम्हां सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा!



**विशाल सोळंकी**
आयुक्त (शिक्षण)
महाराष्ट्र, पुणे.

सर्व शिक्षक बंधू-भगिनींना शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा! २०२० हे वर्ष स्वत:च वेगळेपण घेऊन आले आहे. पूर्वी कधीच घडलेल्या नाहीत, अशा अनेक बाबी या वर्षात आपणांला बघायला व अनुभवायला मिळाल्या आहेत. लॉकडाऊन हा शब्द नेहमीचा झाला आहे. सर्व व्यवहार कसे कुलूपबंद होऊ शकतात याची प्रचिती आपण वेळोवेळी घेत आहोत. सर्व जग ठप्प झाले, शाळा बंद झाल्या, तरी पण तुमच्या सर्वांच्या सहकार्याने आपण विद्यार्थ्यांचे शिक्षण मात्र विविध प्रयत्नांनी सुरळीत सुरू ठेवले आहे याचा मला अभिमान आहे.

शिक्षक दिनाच्या दिवशी आपले नेहमीचे कार्यक्रम आपण घेऊ शकणार नाही. सद्य:स्थितीत दुसरा कुठला मार्गही नाही, पण या आपत्तीजन्य परिस्थितीत आपण कोरोना योद्धा बनून शासनाला जे मोलाचे सहकार्य केले आहे, ते निश्चितच प्रशंसनीय आहे. शिक्षक हा देशाचा आधारस्तंभ असतो. तुमच्यामुळेच देशाची भावी पिढी सुसंस्कृत, उत्पादनक्षम व या देशाचा गौरव वाढविणारी घडणार आहे. आपल्यावरील या जबाबदारीचे भान ठेवून आपण करीत असलेल्या प्रत्येक कार्याला शासनाचा नेहमीच पाठिंबा असणार आहे. आपल्या यशस्वी वाटचालीसाठी व आजच्या शिक्षक दिनानिमित्त पुन्हा एकदा मन:पूर्वक शुभेच्छा!

# शिक्षण : सहिष्णू समाज निर्मितीचे साधन

**प्रशांत डवरे**
प्र. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अमरावती.
भ्रमणध्वनी : ७०५७५१९३७९

**मुलाखत : मा. ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू**
राज्यमंत्री, शालेय शिक्षण.

**प्रश्न : शिक्षणाचा आपल्याला अभिप्रेत असलेला अर्थ कोणता?**

**उत्तर :** माणसातील वाईट प्रवृत्तींचे नियमन होऊन चांगल्या प्रवृत्तींचा परिपोष ज्याने होतो, ते सर्व आचार, विचार, संस्कार म्हणजे शिक्षण. शाळेत शिकणे हा एकूण शिक्षण प्रक्रियेतील एक भाग आहे असे मला वाटते. वरील जी प्रक्रिया मी सांगितली त्यातून विकसित होत जाणारी समज आणि जगाकडे पाहण्याचा परिपक्व होत जाणारा दृष्टिकोन हे शिक्षणच होय. वैराग्य मूर्ती गाडगेबाबा चार भिंतींच्या आत खूप कमी शिकले, मात्र संपूर्ण जगाला अनेक बाबी शिकवून गेले म्हणूनच शालेय शिक्षणाने वर्ग आणि पाठ्यपुस्तक यांच्या चौकटीत न राहता, विद्यार्थ्यांच्या जीवनाशी स्वत:ला जोडून घेतले पाहिजे. प्रत्यक्ष जीवन व शालेय शिक्षण यांच्यातील दरी कमी करणे ही आताची मोठी गरज आहे.



**प्रश्न : शिक्षण खात्याविषयी आपल्या काय भावना आहेत?**

**उत्तर :** मी समाज कारणासाठीच राजकारणात शिरलो. समाज व्यवस्था अधिक सुदृढ व्हावी आणि आश्वस्त शांत, सहिष्णू समाजाची निर्मिती व्हावी असे प्रत्येकालाच वाटते. याकरिता शिक्षण हे प्रभावी साधन होय. त्यामुळे शिक्षण खात्यात काम करायला मिळत आहे, हे माझे भाग्य होय. आमचे शासन, शिक्षण खाते महाराष्ट्रातील प्रत्येक बालकाला मोफत, दर्जेदार, सक्तीचे शिक्षण देण्यास कटिबद्ध आहे.

**प्रश्न : शिक्षणाचे माध्यम मातृभाषा हेच असावे असे मत विविध शिक्षणतज्ज्ञांनी मांडले आहे. मात्र पालकांचा ओढा इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे दिसतो. अशा स्थितीत मातृभाषेतून शिक्षण घेण्याबाबत आपले मत काय आहे?**

**उत्तर :** आजच्या जागतिकीकरणाच्या काळात इंग्रजी ही ज्ञानभाषा झालेली आहे. त्यामुळे कदाचित पालकांचा ओढा इंग्रजीकडे असेल, तरीही व्यक्तीच्या आयुष्यामध्ये मातृभाषेचे महत्त्व कदापि कमी होत नाही. प्राथमिक शिक्षणासाठी मातृभाषा हे सर्वांत प्रभावी माध्यम आहे.

**प्रश्न : कोविड-१९ च्या काळात ऑनलाईन शिक्षणाविषयी आपले मत काय आहे?**

**उत्तर :** कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर सुरक्षिततेच्या कारणामुळे शाळा बंद करण्यात आल्या. जेव्हा शिक्षक व विद्यार्थी यांचा प्रत्यक्ष संपर्क स्थापित होणे शक्य नाही असे स्पष्ट झाले तेव्हा शासनाने विविध मार्गांचा शोध घेतला. विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचविण्याचा प्रयत्न केला. याद्वारे १०० टक्के विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचता आले असा दावा मी करीत नाही परंतु राज्यातील बहुतांश विद्यार्थ्यांपर्यंत विविध माध्यमांतून शिक्षण पोहोचविण्याचा प्रयत्न शासन करीत आहे. ऑनलाईन शिकण्याचा अतिरेक मात्र नको, कारण ज्यांच्याजवळ संसाधने आहेत त्यांचे ठीक आहे

परंतु ग्रामीण, आदिवासी क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे काय? अशा विद्यार्थ्यांमध्ये न्यूनगंड निर्माण व्हायला नको, पण एकंदरीत शिक्षण प्रक्रियाच ठप्प पडण्याऐवजी तंत्रज्ञानाचा उपयोग करून जे शिक्षक, शाळा व पालक मेहनत घेत आहेत, ते ठीक आहे असेच म्हणावे लागेल.

**प्रश्न : जे विद्यार्थी ऑनलाईन पद्धतीने शिकू शकत नाहीत, त्यांचेकरिता ऑफलाईन शिक्षण याविषयी काय पर्याय असू शकतात?**

**उत्तर :** ज्या भागात कोविड-१९ चा प्रादुर्भाव अत्यंत कमी आहे किंवा जवळजवळ नाहीच, त्या भागात नियमांचे पालन करून प्रत्यक्ष शाळा सुरू करायला काही हरकत नाही. अकोला जिल्ह्यात आपण प्रायोगिक तत्त्वावर सोशल डिस्टन्सिंग पाळून, आळीपाळीने शिक्षकवर्ग बोलावून, इयत्ता तिसरी ते सातवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष शिक्षणाला सुरुवात केलेली आहे.

**प्रश्न : कोविड-१९ च्या काळात शाळा बंद असताना शिक्षकांकडून आपल्या काय अपेक्षा आहेत?**

**उत्तर :** शाळा बंद असण्याच्या या काळात वेळेचा सदुपयोग करून शिक्षकांनी आपले स्वत:चे व्यावसायिक कौशल्य तसेच शैक्षणिक तंत्रज्ञान हाताळण्याचे कौशल्य विकसित करण्यावर भर द्यावा. तसेच विद्यार्थ्यांच्या संपर्कात राहून त्यांना स्वयं-अध्ययनाकरिता प्रेरित करावे, तसेच त्यांचे समुपदेशन सुद्धा करावे.

**प्रश्न : NAS मध्ये महाराष्ट्र राज्याच्या गुणवत्तेचा स्तर उंचाविण्यासाठी आपले काय प्रयत्न असतील?**

**उत्तर :** भारताची शैक्षणिक व्यवस्था ही संख्यात्मकदृष्ट्या जगात दुसऱ्या क्रमांकाची आहे, पण गुणात्मकदृष्ट्या क्रमांक मात्र खूपच खालचा आहे. NAS च्या अहवालातून वरील विधानाला पुष्टीच मिळते. गुणवत्तेचा स्तर उंचावण्यासाठी पर्यवेक्षीय यंत्रणा अधिक जबाबदार व सक्षम करावी लागेल. या यंत्रणेतील मुख्याध्यापक पद फार महत्त्वाचे व निर्णायक आहे. ते पद सरळ सेवा स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून भरता येईल काय याचा विचार करावा लागेल. तसेच पाठ्यपुस्तक अभ्यासक्रम, वर्गखोली यांच्या बाहेर जाऊन, शैक्षणिक प्रयोग करण्यास उत्तेजन देणाऱ्या लवचीक शालेय व्यवस्थेवर भर देण्यावर आमचा प्रयत्न राहील.

**प्रश्न : खाजगी शाळांमध्ये 'फी' नियमन व २५ टक्के प्रवेशाबाबत आपले मत काय? त्या अनुषंगाने कोणत्या सूचना आपण द्याल?**

**उत्तर :** अतिरिक्त शुल्क आकारणी करणाऱ्या शाळांची गय केली जाणार नाही. नियमाविरुद्ध शुल्क घेणाऱ्या अकोल्यातील एका शाळेवर नुकतीच फौजदारी कारवाई करण्यात आली.

RTE अंतर्गत २५ टक्के प्रवेशामुळे गरीब कुटुंबांतील मुलांना उत्तम शिक्षणाच्या संधी उपलब्ध होतात. राज्यात सर्वत्र सदर कायद्याची अंमलबजावणी पारदर्शकपणे होण्याकडे शासन लक्ष पुरवेल.

**प्रश्न : वीटभट्टीवरील व इतर ठिकाणच्या शाळाबाह्य मुलांसाठी राज्य स्तरावर कायमस्वरूपी असे आपले काय धोरण असेल?**

**उत्तर :** अमरावती जिल्ह्यातील वीटभट्टी शाळेला मी स्वत: भेट दिली होती. त्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय केली गेली. शासनाद्वारे शाळाबाह्य विद्यार्थ्यांकरिता बालरक्षक चळवळ राबविली जाते. सर्व बालरक्षकांना ओळखपत्र वाटपाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. मुळातच मूल शाळाबाह्य राहतं कसं याचाही विचार तुम्ही-आम्ही समाजाचे घटक म्हणून करायलाच पाहिजे.

**प्रश्न : शिक्षक, मुख्याध्यापकांकडून प्रशासकीय किंवा आर्थिक बाबतीत हयगय झाल्यास कार्यवाही होते, परंतु गुणवत्ता कमी असल्यास कोणतीच कार्यवाही संबंधितांवर होत नाही, याबाबत आपले मत काय?**

**उत्तर :** शिक्षण हक्क कायद्यात या बाबतीत स्वयंस्पष्ट तरतुदी आहेत. त्या कायद्यानुसार जबाबदारी निश्चित होऊन कार्यवाही व्हायला हवी.

**प्रश्न : ग्रामीण क्षेत्रातील शिक्षण व शहरी क्षेत्रातील शिक्षण या बाबींकडे आपण कसे पाहता?**

**उत्तर :** माझे संपूर्ण शिक्षण हे ग्रामीण भागात झालेले आहे. ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था मी अगदी जवळून पाहिलेली व अनुभवलेली आहे. शहरी क्षेत्रामध्ये शैक्षणिक सोयीसुविधा या अधिक प्रमाणात असतात व ग्रामीण क्षेत्रामध्ये त्यांचा अभाव असतो. ग्रामीण क्षेत्रामधून शिक्षण घेतलेल्या व्यक्तीमध्ये जेव्हा न्यूनत्वाची भावना दिसून येते तेव्हा मला वाईट वाटते. आपल्या माध्यमातून मी महाराष्ट्रातील ग्रामीण भागात शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना सांगू इच्छितो की, या देशामध्ये अनेक वैज्ञानिक, संशोधक, विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ व अनेक राजकीय व सामाजिक नेते हे ग्रामीण क्षेत्रात शिक्षण घेऊनच पुढे आलेले आहेत. ग्रामीण क्षेत्रातील विद्यार्थ्यांना शहरी क्षेत्राप्रमाणेच सर्व शैक्षणिक सुविधांची उपलब्धता करून देण्याकरिता शासन कटिबद्ध आहे.

**प्रश्न : शैक्षणिक क्षेत्रातील विषमतेबाबत आपण अनेकदा आपले मत मांडत असता, पण शैक्षणिक विषमता याबाबतीत आपली मते काय आहेत?**

**उत्तर :** आपला देश हा विविधतेने नटलेला आहे. मात्र विविधतेतील काही घटकांमध्ये उच्चतेची भावना व काही घटकांमध्ये निम्नपणाची भावना जागृत होते, तेव्हा त्याकडे विषमता म्हणून पाहिले जाते. विषमता ही कोणत्याही पातळीवर, कोणत्याही प्रकारे निषिद्धच आहे. आपला देश स्वतंत्र झाला तेव्हापासून सातत्याने विषमता संपुष्टात आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. समता प्रस्थापित करण्याचा सर्वांत महत्त्वाचा मार्ग शिक्षण हाच आहे. मात्र शिक्षण क्षेत्रातच विषमता दिसून येते तेव्हा वाईट वाटते. गरिबांच्या शाळा वेगळ्या, श्रीमंतांच्या शाळा वेगळ्या, गरिबांच्या व श्रीमंतांच्या शैक्षणिक संधींमध्ये समानता नसणे या बाबींना मी शैक्षणिक विषमता असे मानतो. शैक्षणिक विषमता नष्ट झाल्याशिवाय समाजातील अन्य कुठल्याही क्षेत्रातील विषमता नष्ट करता येणार नाही. शैक्षणिक विषमता नष्ट करायची असेल, तर राज्यातील सर्व क्षेत्रांतील सर्व विद्यार्थ्यांना समान गुणवत्तापूर्ण शिक्षण प्राप्त झाले पाहिजे.

**प्रश्न : दिव्यांग / विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाविषयी आपण काय सूचित कराल?**

**उत्तर :** यापूर्वीच RTE कायद्यांतर्गत दिव्यांग मुलांच्या गरजांसाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्याची गंभीरतापूर्वक अंमलबजावणी व्हायला हवी, ही शासनाची भूमिका आहे. एकही दिव्यांग विद्यार्थी प्रचलित शिक्षण प्रक्रियेपासून वंचित राहणार नाही हे पाहणे शासन म्हणून माझे कर्तव्य आहे.

**प्रश्न : विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी आपण काय सांगाल?**

**उत्तर :** विद्यार्थी, पालक आणि शिक्षक हे शिक्षण प्रक्रियेचे तीन कोन आहेत. या तीनही घटकांत परस्पर समन्वय उत्तम असायला हवा. पालकांनी शालेय व्यवहारात सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. शालेय व्यवस्थापनावर आणि शिक्षकांवर नैतिक अंकुश ठेवण्याची जबाबदारी पालकांनी घेतली पाहिजे. संपूर्ण राज्यातील पालकांना माझे आवाहन आहे की, कुठेही अनुचित प्रकार घडत असेल तर माझ्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

**प्रश्न : ५ सप्टेंबरला 'शिक्षक दिन' आहे; त्या निमित्त आपण शिक्षकांना काय संदेश देणार आहात?**

**उत्तर :** शिक्षकांच्या आचरणातूनच विद्यार्थी खरेखुरे शिक्षण घेत असतात म्हणून आपल्या आचरणाकडे शिक्षकांनी लक्ष द्यावे. ज्यांच्याजवळ चारित्र्याची संपन्नता नाही त्यांनी शिक्षक होऊ नये असे डॉ. राधाकृष्णन यांचे मत होते, ते मलाही योग्य वाटते.

शिक्षक प्रेमळ असला पाहिजे. प्रेमळ शिक्षकांनी अनेक विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणल्याचे मी पाहिले आहे.

■■■

# लॉकडाऊनमधील उपक्रमांचा जागर

**डॉ. मंजूषा क्षीरसागर**
प्र. प्राचार्य तथा वरिष्ठ अधिव्याख्याता,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जळगाव.

जळगाव जिल्ह्यात राष्ट्रव्यापी निष्ठा प्रशिक्षणामुळे प्राथमिक शिक्षण विभागात आलेला उत्साह, निर्माण झालेली उपक्रमशीलता फेब्रुवारी महिन्यात शिगेला पोहोचली होती. येत्या शैक्षणिक वर्षात जूनपासून शिक्षकांसोबत काम करण्याचा निर्णय आम्ही घेतला, शिक्षकही विद्यार्थ्यांसाठी काय प्रयत्न करायचे याची नेमकेपणाने आखणी करून संवाद करीत होते. अशा चैतन्यदायी वातावरणात कोविड-१९ चे संकट आले. दि. २१ मार्च २०२० पासूनचा लॉकडाऊन अस्वस्थ करीत होता. शिक्षक-विद्यार्थी संवाद कसा करावा हे कोडे उलगडत नव्हते. या परिस्थितीत दि. ६ एप्रिल २०२० रोजी मा. शिक्षणमंत्री, मा. शिक्षण सचिव, मा. आयुक्त, मा. संचालक यांनी ऑनलाईन बैठकीतून संवाद साधला. सूचक मार्ग देखील सांगितले. आशेचा किरण मिळाला. आमची जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेची टीम कामाला लागली. निष्ठा प्रशिक्षणामुळे शिक्षक संवाद दृढ झाला होता. तो कायम ठेवण्याचा प्रयत्न ऑनलाईन शिक्षणातून केला. तसेच विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी समुपदेशनाद्वारे मदत केली. या काळात आम्ही केलेले प्रयत्न थोडक्यात आपल्यासमोर मांडत आहे :

> *शाळा बंदच्या काळात शिक्षक-विद्यार्थी संवाद कसा करावा हे कोडे उलगडत नव्हते. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी ऑनलाईन बैठकीत संवाद साधून शिक्षकांना दिशा दिली. सूचक मार्ग सांगितले आणि शिक्षक कामाला लागले. उपक्रमशील शाळा व शिक्षक लक्षात घेऊन त्यांच्याशी संवाद झाला आणि त्यातून नऊ पुस्तिकांची निर्मिती कशी केली त्याविषयी....*

**संस्था ब्लॉग निर्मिती व स्टडी फ्रॉम होम :** जिल्ह्यातील तीन तंत्रस्नेही शिक्षकांची मदत घेऊन दि. १२ एप्रिल २०२० पासून संस्थेने ब्लॉगवर इयत्तानिहाय ऑनलाईन टेस्ट, दिक्षा ॲपच्या व्हिडिओ लिंक्स्, अध्ययन पूरक साहित्य, स्व-अभिव्यक्ती लेखन असा अभ्यास, संपर्क अधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी यांच्यामार्फत प्रत्येक शाळेवर पाठविला. एकूण १९ दिवस चालविलेल्या या उपक्रमात २ लाख १८ हजार विद्यार्थी व पालक यांनी ब्लॉगला भेट दिली. सोडविलेल्या चाचण्यांचे गुणदान केले. दिक्षा ॲप वापराचे प्रमाण वाढू लागले.

**'दिक्षा दिवस' :** संस्थेमार्फत दिक्षा ॲप उपयोगात आणण्याचे प्रमाण वाढविण्याच्या हेतूने दि. ३० एप्रिल २०२० रोजी 'दिक्षा दिवस' साजरा करण्यासाठी शिक्षण विभागातील प्रत्येकाला दिक्षा ॲप डाऊनलोड, व्हिडिओ माध्यमातून संकल्पना, संबोध स्पष्टीकरण यांबाबत समुपदेशन केले. शिक्षक, पालक व विद्यार्थी यांच्यामध्ये त्याच्या वापराबाबत जागृती केली. परिणामी दिक्षा ॲप वापराबाबत आमच्या जिल्ह्याचा आलेख वाढला.

**शिक्षक संवादातून नऊ पुस्तकांची निर्मिती :** संस्थेमार्फत केलेल्या पथक भेटी, संपर्क तालुक्यातील शाळा भेटी, निष्ठा प्रशिक्षण यांतून उपक्रमशील शाळा कोणत्या आहेत, ते लक्षात आले व शिक्षकांशी संवाद झाला.

१) **सफर पहिलीच्या वर्गाची (इयत्ता पहिली अध्ययन-अनुभव भाषा) :** इयत्ता पहिलीच्या वर्ग शिक्षकांनी

 ४ सप्टेंबर : भारताचे पितामह दादाभाई नौरोजी जन्मदिन (१८२५)

भाषा अध्ययन निष्पत्तींसह श्रवण, भाषण–संभाषण, वाचन–लेखन क्षमता प्राप्तीसाठी दिलेले अध्ययन–अनुभव पुस्तिकेत दिलेले आहेत. पंधरा तालुक्यांतील इयत्ता पहिलीचा वर्ग उत्तम असणाऱ्या शिक्षकांनी केलेला संवाद इतर शिक्षकांना फलदायी ठरेल.

२) **सफर पहिलीच्या वर्गाची (इयत्ता पहिली अध्ययन–अनुभव गणित) :** इयत्ता पहिलीच्या पाठ्यपुस्तकातील गणिताबरोबर, व्यावहारिक गणिताची जोड देऊन मुलांना संख्या, संख्याज्ञान, बेरीज, वजाबाकी या मूलभूत क्षमतांमध्ये तयार करणाऱ्या वर्ग शिक्षकांचे अध्ययन–अनुभव प्रस्तुत पुस्तकात संग्रहित केले आहेत.

३) **सामाजिक शास्त्रातील उपक्रमाची उपयुक्तता :** इयत्ता पाचवी ते आठवीसाठी इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र या विषयांतील विविध संबोध, संकल्पना उपक्रम या आकारिक साधनांच्या साहाय्याने अध्ययन निष्पत्तींसह जीवनकौशल्ये, गाभाभूत घटक साध्य होतात हे उदाहरणांसह पुस्तिकेत दिलेले आहे.

४) **शिक्षक आमचे मित्र :** समावेशित वर्गातील दिव्यांग मुलांना समजून घेत अध्ययन शैलीच्या मदतीने सामान्य मुलांबरोबर त्यांचे समावेशन करणे, शिकणे सुलभ करीत त्यांना टिकविणे या हेतूने शिक्षक, पालक आणि समाज यांना उपयुक्त मार्गदर्शक हस्तपुस्तिका म.न.पा. जळगाव, समावेशित विभागासाठी संस्थेने काढली आहे.

५) **इस्कुलमा जावो बाजऱ्या हम :** जळगाव जिल्ह्यातील चोपडा, यावल, रावेर तालुक्यातील शाळा आदिवासी (पावरा भाषक) बहुल भागात आहे. याच भागातील शिक्षकांनी ज्यात पावरा गाणी, गोष्टींचा समावेश आहे अशी पावरा–मराठी उजळणी सारखी पुस्तिका लिहिली आहे; ज्यामुळे शिक्षकांना मुलांची भाषा समजून घेत शिकण्यासाठी मदत होईल.

या सर्व पुस्तकांची निर्मिती करताना ऑनलाईन पुस्तकांची कल्पना सुचली. मा. संचालक यांनी बैठकीत आपल्या जिल्ह्यातील शाळांच्या यशोगाथा आपल्या जवळ नसतात ही खंत व्यक्त केली होती. त्या बैठकीतून प्रेरणा घेऊन प्राथमिक शिक्षकांच्या मदतीने लॉकडाऊन व अनलॉकच्या काळात पुढील चार पुस्तकांची निर्मिती केली.

६) **धडपडणारे शिक्षक :** आपल्या शाळेची वा वर्गाची प्रगती करण्यासाठी केलेले उपक्रम वा प्रयोग यांचा समावेश या पुस्तकात आहे. कार्य करणाऱ्या शिक्षकांना प्रोत्साहन देणे व इतर शिक्षकांना प्रेरणा देणे या हेतूने पहिले ऑनलाईन पुस्तक तयार केले.

७) **उपक्रमशील शाळा :** जळगाव जिल्ह्यातील १५ तालुक्यांतील गुणवत्ता प्राप्तीसाठी धडपडणाऱ्या शिक्षकांनी शाळेतील नावीन्यपूर्ण उपक्रम वा सातत्य असलेले विविध उपक्रम, ज्यात भौतिक सुविधा, लोकवर्गणी, समाज सहभाग, परसबाग, कवायतींसह इतर अनुभव आहेत; ते तालुका संपर्क अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांच्या मदतीने संकलित केले आहेत.

८) **आम्ही कृतिशील शिक्षिका (तालुका जामनेर) :** जामनेर तालुक्यातील इयत्ता पहिली ते सातवीला शिकविणाऱ्या शिक्षिकांनी आपल्या वर्गातील वर्गांतर क्रियेसाठी कृती व उपक्रमाची मदत घेत दिलेले अध्ययन अनुभव, अध्ययन निष्पत्तींसह या पुस्तकात मांडलेले आहेत.

९) **आम्ही उपक्रमशील शिक्षिका (पाचोरा तालुका) :** पाचोरा तालुक्यातील शिक्षिकांनी आपल्या शाळेत व वर्गात अध्ययन निष्पत्ती, जीवन कौशल्ये, मूल्य, क्षमता यांसाठी राबविलेले अभ्यासपूरक वा इतर उपक्रमांचे अनुभव लिहिलेले आहेत.

सर्व पुस्तकांच्या निर्मितीत प्राथमिक शिक्षकांचा सिंहाचा वाटा आहे ही बाब अभिमानाने नोंदवावीशी वाटते. संस्थेमार्फत लॉकडाऊन काळात वर नमूद केलेली एकूण ९ पुस्तके संकलित झाली आहेत.

**शाळा आली आपल्या दारी :** लॉकडाऊन काळात समावेशित शिक्षणांतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांचे पालक, भावंडे, वर्ग शिक्षक, मुख्याध्यापक यांच्या मदतीने मुलांचे शिकणे सुरू ठेवण्यात आले. ३५० विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचण्यासाठी प्रयत्न केला गेला. ऑगस्टमध्ये सणांच्या पार्श्वभूमीवर व्हिडिओ दाखवून मुलांकडून राख्या, गणपती, बैल तयार करून घेतले. प्रस्तुत उपक्रम आजही संस्थेमार्फत सुरू आहे.

**ग्राम दक्षता समिती प्रशिक्षण :** कोरोनाचा धोका गावपातळीवर टाळण्यासाठी प्रत्येक गावात ग्राम दक्षता समिती स्थापन करण्यात आली आहे. 'कोरोना संकटात समिती सदस्यांची भूमिका व जबाबदारी' या विषयावर ग्रामविकास विभागातर्फे मा. जिल्हाधिकारी व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशान्वये २७ व २८ जुलै रोजी संस्थेच्या वतीने ऑनलाईन प्रशिक्षण घेण्यात आले, ज्यात १५ तालुक्यांतील सर्व ग्राम दक्षता समितीचे सदस्य सहभागी झाले होते.

**सेवापूर्व विभाग ऑनलाईन शिक्षण :** जळगाव जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयातील मराठी व उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिक्षण सुरू रहावे यासाठी व्हिडिओ, कृती स्वाध्याय व चाचणी यांबाबत मार्गदर्शन केले. प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी विषयनिहाय सराव प्रश्नसंच तयार करणे सुरू आहे. ते संस्थेच्या ब्लॉगवर अपलोड केले जातील व विद्यार्थी त्याचा लाभ घेतील.

**जिल्हास्तरीय ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा व ऑनलाईन चर्चासत्र :** दि. १३ जून २०२० रोजी जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळासोबत विद्यार्थ्यांसाठी कोरोना दुष्टापत्ती-इष्टापत्ती, आजीबाईचा बटवा व कोरोना उपाय इ. विषयांवर विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांच्यासाठी 'शिक्षणाच्या बदलत्या भूमिका आणि माध्यमे', 'ऑनलाईन शिक्षण : काळाची गरज', 'अवकाश शिक्षणातील वाटा', 'गणित-विज्ञान अध्ययन-अध्यापन सोपे कसे होईल' या विषयांवर अभ्यासू नामवंतांमार्फत चर्चा घडवून आणली. शेकडोजण यात सहभागी झाले.

**तालुका गुणवत्ता कक्ष बैठका :** सर्व संपर्क अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांनी एकत्रित दि. १७ ते २० ऑगस्ट २०२० या कालावधीत ऑनलाईन गुणवत्ता कक्षाच्या बैठका घेतल्या. त्यातील विषय :

अ) शाळाबाह्य मुले - सर्वेक्षण, तात्पुरता प्रवेश, नियमित प्रवेश, ब) कोविड काळातील शिक्षणविषयक परिपत्रके व आपली भूमिका, क) अंगणवाडीतील बालशिक्षण, ड) ऑनलाईन शिक्षण परिषदा, इ) गंदगीमुक्त भारत अभियान, फ) तालुक्यातील ऑनलाईन-ऑफलाईन शिक्षणाबाबत तीन उत्तम उपक्रम संकलन व Education action Plan ची निर्मिती, ग) तालुक्यातील शिक्षकांना तालुकानिहाय ऑनलाईन शिक्षण देण्यासंदर्भात तंत्रस्नेही प्रशिक्षणाची गरज, ह) तालुकानिहाय ऑनलाईन शिक्षणाची सद्य:स्थिती, च) व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन इत्यादी...

वरील बाबींवर वरिष्ठ अधिव्याख्याता, अधिव्याख्याता व गटशिक्षणाधिकारी यांनी मार्गदर्शन केले.

**ऑनलाईन शिक्षण परिषदा :**

संस्थेमार्फत कोविड काळातील माझ्या शाळेतील आणि वर्गातील ऑनलाईन शिक्षण व केंद्रातील उत्तम उपक्रमांचे संकलन या विषयावर दि. २१ ते २९ ऑगस्ट २०२० या कालावधीत चर्चा आयोजित करण्याबाबत मार्गदर्शन केले. तालुकानिहाय आयोजन, वेळापत्रक गटशिक्षणाधिकारी यांनी तयार केले. उत्तम उपक्रमांचा ऑनलाईन व ऑफलाईन शिक्षणाचा कृती कार्यक्रम, विषय साधनव्यक्ती, आयईडी समन्वयक, विशेष शिक्षक सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात करीत आहेत. सर्व मुलांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करीत आहोत परंतु विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील प्रत्यक्ष भेटीबाबत अस्वस्थता कायम आहे. पण 'मन में है विश्वास' म्हणत लवकरच शाळेत किलबिलाट ऐकू येईल आणि आपण सगळेच शिक्षक व विद्यार्थी एकमेकांशी प्रत्यक्ष संवाद करू ही आशा आहे.

■■■



५ सप्टेंबर : डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जन्मदिन (१८८८)

# ऑनलाईन शिक्षणाची दिशा

**डॉ. सुचिता पाटेकर,**
शिक्षणाधिकारी (प्राथ.), जि. प. परभणी
भ्रमणध्वनी : ९८६९०२०२७२

कोरोनाच्या कठीण काळात सर्वांत मोठा आणि सर्वांना भेडसावणारा प्रश्न होता शिक्षणाचा! मार्चपासून बंद पडलेल्या शाळा कधी सुरू होतील, कशा सुरू होतील, असे प्रश्न सर्वांनाच पडलेले. शाळा बंद म्हणून शिक्षणही बंद अशी अवस्था सुरुवातीच्या काळात होती. ही स्थिती बदलणे आवश्यक होते. बंद असलेले शिक्षण सुरू करणे गरजेचे वाटू लागले होते. यासाठी पालक, शिक्षक आणि प्रशासन अशा तिघांनी मिळून काम करण्याची, एकमेकांना विश्वासात घेऊन पुढाकार घेण्याचीही गरज होती. परभणी जिल्हा आकाराने छोटा असला तरी प्रयोगशील आहे. येथील शिक्षक हेच जिल्ह्याचे बलस्थान असून शिक्षकांमध्ये असलेली नावीन्याची आवड सर्वांना कमालीची प्रेरित करीत असते. कोरोना काळात शाळा बंद असल्या तरी शिक्षण सुरू ठेवण्यास जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळत असून, याचे सर्व श्रेय जिल्ह्यातील शिक्षकांनाच आहे. आपल्या शाळेत डिजिटल शिक्षण सुरू करण्यासाठी शिक्षक प्रयत्नरत आहेत. शिक्षक व विद्यार्थ्यांना या कार्यक्रमाबाबत माहिती देण्यासाठी व प्रोत्साहित करण्यासाठी ऑनलाईन मीटिंग, कार्यशाळा तसेच शाळा, पालक व विद्यार्थी गृहभेटी असा त्रिस्तरीय कार्यक्रम आखण्यात आला आहे. ऑनलाईन कार्यशाळा व मीटिंगमधून वातावरण निर्मिती, माहिती, प्रोत्साहन व शंका निरसन तसेच शाळा, पालक व विद्यार्थी गृहभेटीतून उपक्रमांची देवाण-घेवाण व विचारविनिमय होत आहे. जिल्ह्यात शिक्षकांमध्ये डिजिटल शिक्षणाचे तंत्र रुजवून जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये ऑनलाईन शिक्षण पोहोचविण्यासाठी आमचे प्रयत्न चालूच आहेत, या सर्व प्रयत्नांतूनच कामाची पुढील दिशा मिळत असून दररोजचा नवा अनुभव आणखी कार्य करण्यास प्रोत्साहित करीत असतो.

> *शाळा बंद असताना शिक्षण कसे सुरू ठेवायचे हा प्रश्न सर्वांच्या पुढे होता. प्रत्येक जिल्ह्यातील शिक्षक एकमेकांच्या संपर्कात येऊन विचार करीत होते. परभणी जिल्हाही त्याला अपवाद नव्हता. येथील प्रयोगशील शिक्षक हेच जिल्ह्याचे बलस्थान होते. त्यांच्या एकत्रित प्रयत्नांनी इतर शिक्षकही तंत्रस्नेही बनले आणि विद्यार्थ्यांपर्यंत ऑनलाईन शिक्षण पोहोचले. त्याविषयी...*

## ऑनलाईन मीटिंग :

प्रत्येक तालुक्यातील प्रत्येक केंद्राची आढावा सभा घेतली. या प्रत्येक मीटिंगमध्ये माझा व्यक्तिश: सहभाग होता. 'शाळा बंद, पण शिक्षण सुरू' या विषयावर शिक्षकांशी लाईव्ह बोलले. गुगल मीट आणि झूमद्वारे शिक्षण सुरू करण्याच्या सूचना दिल्या. दिक्षा, टीली मिली यांसह इतर सर्व साधने, उपकरणे व पद्धतींचा उपयोग करण्याच्या सूचना केल्या. पालक व शाळा व्यवस्थापन समिती यांच्या बैठका ऑनलाईन घेऊन पालक व समित्यांना मुलांच्या शिक्षणासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी मा. पृथ्वीराज बी. पी., जिल्हा परिषद, परभणी यांनी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांच्या शिक्षण परिषदा आयोजित करण्याचे नियोजन केले आहे. त्यापैकी पूर्णा आणि जिंतूर या दोन तालुक्यांच्या शिक्षण परिषदा झालेल्या आहेत. या शिक्षण परिषदांमध्ये शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, पालक, सर्व शिक्षक व पर्यवेक्षकीय यंत्रणेतील सर्व घटक उपस्थित असतात. सर्वांसोबत चर्चा करून सविस्तर आढावा घेण्यात येतो. गावातील शाळेत शिक्षणाची काय परिस्थिती आहे हे मुख्य कार्यकारी अधिकारी आवर्जून जाणून घेतात. त्या दृष्टीने गावात उपाय सुचविले जातात.

शिक्षण परिषदांमुळे पालकांच्या मनात मुलांच्या शिक्षणाबद्दल जाणीवजागृती निर्माण होताना दिसून येत आहे.

## ऑनलाईन चाचणी :

शाळा बंद झाल्यावर मार्च आणि एप्रिलचे काही दिवस परिस्थितीचा अंदाज घेण्यात गेले. मात्र या काळात काय करावे याबाबत सातत्याने विचार सुरू होताच. मार्च–एप्रिल हा खरे तर परीक्षेचा काळ. मुलांचा अभ्यासक्रम संपला होता किंवा संपायला आला होता. परीक्षा तेवढ्या बाकी होत्या. मग मुलांना ऑनलाईन प्रश्नपत्रिका देऊन त्या सोडविण्यास सांगणे हा विचार अमलात आणण्याचे ठरविले आणि प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी शिक्षकांचा शोध सुरू केला. तंत्रस्नेही शिक्षकांच्या मदतीने हे सर्व शिक्षक ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर एकत्र केले. भाषा, गणित, विज्ञान आणि सामाजिक शास्त्र असे विषयनिहाय शिक्षकांचे गट तयार केले. त्यातून गुगल फॉर्मवर प्रश्नपत्रिका निर्माण करून त्या जिल्ह्यात मुलांपर्यंत पोहोचविण्याचे नियोजन केले. त्यासाठी प्रत्येक शाळेला मुलांचे व्हॉट्सअॅप व एस.एम.एस. ग्रुप तयार करावे असे सूचित करण्यात आले. शिक्षकांनी पालकांच्या मदतीने या ऑनलाईन प्रश्नपत्रिका मुलांपर्यंत 'लिंक'च्या माध्यमातून पोहोचविल्या. मुले प्रश्न वाचून या चाचण्या आनंदाने सोडवू लागली. मूल्यमापन करण्याची सोय गुगल फॉर्ममध्येच असल्याने मुले स्वत:चे मूल्यमापन स्वतःच करू लागली. ऑनलाईन चाचणी सोडविली की लगेच गुण समजत असल्यामुळे मुले अधिकाधिक प्रेरित आणि प्रोत्साहित होत होती. अशा प्रकारे मुले ऑनलाईन शिक्षण घेता घेता मोबाईलचा वापरही व्यवस्थितपणे करू लागली. पालकही या कार्यात मुलांना व शिक्षकांना मदत करीत होते. पालक यावेळी मुलांच्या शिक्षणातील



दुवा ठरले. शिक्षकांनी पालकांना सूचना द्यायच्या आणि पालकांनी त्याप्रमाणे मुलांकडून कृती करून घ्यायची असा उपक्रम चालू होता. कोरोनामुळे अख्खे जग थांबलेले असताना आणि सारे व्यवहार ठप्प पडले असताना, आमच्या मुलांचे शिक्षण मात्र सुरू असल्याचे मोठे समाधान आहे असे पालक बोलून दाखवीत होते. यामुळे पालक मुलांना शिकण्यासाठी मोबाईल वापरू देण्यास तयार झाले, तर काही पालकांनी या पुढे जाऊन मुलांना नवीन मोबाईल घेऊन दिले आहेत. गुगलवरील या चाचण्यांमुळे जिल्ह्यातील शिक्षकांजवळ वर्ग व विषयनिहाय प्रश्नपेढ्या संग्रहित झाल्या आहेत. गुगलवर होणाऱ्या परभणी जिल्ह्यातील चाचण्यांच्या लिंक व्हॉट्स ॲपवर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्या. त्या राज्यातील

अनेक जिल्ह्यांतील शिक्षक व विद्यार्थ्यांच्याही पसंतीस पडल्या आहेत. त्यामुळे जिल्ह्याबाहेरील विद्यार्थीही मोठ्या प्रमाणात या चाचण्या सोडवीत असल्याचे मिळत असलेल्या प्रतिसादावरून कळते.

### गुगल मीटचा वापर आणि अभ्यास गटाची निर्मिती :

गुगलवरील ऑनलाईन चाचण्यांनंतर गुगल मीट वर शैक्षणिक वर्ग घेण्याचे तंत्रज्ञान जिल्ह्यातील शिक्षकांनी आत्मसात केले. गुगल मीट ॲपवर अध्यापन करण्याचा पहिला प्रयोग ताडबोरगाव, ता. मानवत या शाळेने केला आहे. विद्यार्थ्यांचे त्यांच्या राहण्याच्या परिसरातच अभ्यास गट तयार करण्यात आले आहेत. गटातील गुणवंत विद्यार्थ्याला विषय मित्र म्हणून नेमून गटातील इतर मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी त्याच्यावर टाकण्यात आली. गावातील शिक्षणप्रेमी नागरिकांना मुलांच्या शिक्षणासाठी आवाहन करण्यात आले. गटातील ज्या मुलाच्या घरी गटातील सर्व मुलांना बसण्यास मोकळी जागा आहे अशा ठिकाणी एकत्र जमून मुले अभ्यास करतात. या अभ्यास गटाला गुगल मीटवर व प्रत्यक्ष भेट देऊन शिक्षक विद्यार्थ्यांना स्वयं–अध्ययनास पूरक कृती सांगतात. मुले शिक्षकांच्या सूचनेनुरूप स्वयं–अध्ययन कृती पूर्ण करतात. हळूहळू अनेक शाळा या तंत्राचा उपयोग करून मुलांपर्यंत शिक्षण पोहोचविण्याचा प्रयत्न करीत आहेत. दररोज असा प्रयोग सुरू करून शाळा बंद असल्या तरी शिक्षण सुरू असल्याची प्रचिती अनेक शाळा, शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांना येत आहे. मी काही अभ्यास गटांना प्रत्यक्ष भेटी दिल्या आहेत. मुलांशी, पालकांशी थेट संवाद साधला आहे. मंगरुळ बु, या गावातील अभ्यास गटांचे फार चांगले अनुभव आहेत. विशेषत: पालक खूप आनंदी आहेत म्हणूनच त्यांचे सहकार्यही मोठ्या प्रमाणात मिळत आहे. मुलांकडून आम्ही शिकत आहोत, अशा पालकांच्या प्रतिक्रिया आहेत.

### तीन तालुक्यांतील तीन शाळांचे एकत्र अध्यापन :

ऑनलाईन शिक्षणात भौगोलिक सीमांचे बंधन राहत नाही. याचा एक चांगला अनुभव या कोरोना काळात आला. तीन तालुक्यांतील तीन वेगवेगळ्या शाळांनी मिळून आगळावेगळा ऑनलाईन वर्ग भरविला आहे. यामुळे मुलांना नव्या शैक्षणिक अनुभवांबरोबरच नवे शिक्षक मिळाले आहेत. धानोरा मोत्या, ता. पूर्णा, चारठाणा, ता. जिंतूर आणि शेखराजूर, ता. पालम येथील प्राथमिक शाळा या उपक्रमात सहभागी असून तिन्ही शाळांतील सातव्या वर्गाचा एकच ऑनलाईन क्लास सध्या या माध्यमातून घेतला जात आहे. अशा प्रकारे जिल्ह्यातील इतरही शाळांनी नियोजन केलेले आहे.

### ऑनलाईन शैक्षणिक सहल :

शाळांनी अतिशय मेहनतीने मुलांपर्यंत गुगल मीट तंत्रज्ञान पोहोचविले असून, मुले मोठ्या आत्मविश्वासाने शिकत असल्याचा अनुभव ऑनलाईन वर्गात सहभागी झाल्यावर येतो. जिल्ह्यातील ऑनलाईन वर्गाला भेट देण्यासाठी जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील शिक्षकांनी व्हर्च्युअल ट्रीप काढल्या आहेत. त्यामुळे गुगल मीटवर शाळा भरवून मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा प्रयत्न जिल्ह्यापुरताच मर्यादित न राहता, तो राज्यातील अनेक शाळांना मार्गदर्शक ठरत आहे.

### स्पर्धा परीक्षेची तयारीही सुरू :

वर्गस्तरावरील शिक्षणासोबतच इयत्ता पाचवी आणि आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षा, नवोदय आणि एनएमएमएस परीक्षांची तयारी करून घेण्याचे कार्य सुरू आहे. सेलू व मानवत तालुक्याच्या वरील परीक्षांच्या अनुषंगाने परीक्षानिहाय स्वतंत्र ऑनलाईन सेशन घेण्यात आले. या प्रत्येक सेशनमध्ये सहभागी शिक्षकांचे कार्य समजून घेतले. त्यांना प्रोत्साहित, प्रेरित केले. या निमित्ताने मी, माझी शाळा यापेक्षा विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये व्यापक दृष्टिकोन निर्माण झाला आणि त्याचा फायदा एकूणच शिक्षण प्रक्रियेला होत आहे.

**सामाजिक दायित्व :**

कोरोना काळात शैक्षणिक कार्य करीत असतानाच सामाजिक दायित्व म्हणूनही शिक्षण विभाग पुढे आला आहे. समाजाला अडचण असेल तिथे मदतीचा हात देण्यासाठी शिक्षक सदैव पुढे असतातच. या संकट काळातही ते मागे राहिलेले नाहीत, ही समाधानाची बाब आहे.

**रक्तदान :**

कोरोना काळात रक्ताचा तुटवडा निर्माण झाल्याने रक्तदान करण्याचे आवाहन राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी केले. परभणी जिल्हा रुग्णालयातही रक्ताचा तुटवडा असल्याचे कळताच रक्तदान करण्याचे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आले. त्यामुळे प्रत्येक तालुक्यात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्याचे नियोजन केले आहे. एरवी शिक्षणविषयक कार्याची वर्दळ असणाऱ्या गट साधन केंद्रात रक्तदान शिबिरांचे आयोजन होत आहे. सेलू येथील थेलेसेमियाग्रस्त बालकांसाठी आयोजित रक्तदान शिबिरात ६८ दात्यांनी रक्तदान केले, तर पाथरी तालुक्यातील ४४ शिक्षक व अधिकारी, कर्मचारी यांनी रक्तदान केले आहे. रक्तदानातून संकलित रक्तपिशव्या जिल्हा शासकीय रुग्णालयास भेट देण्यात आल्या आहेत. रक्तदानासारख्या पवित्र व जीवनदायी कार्यात शिक्षक व शिक्षण विभाग अग्रेसर राहिला आहे. रक्तदानाचे हे कार्य यापुढेही जिल्ह्यातील शिक्षक आणि शिक्षण विभागात कार्यरत सर्व अधिकारी आणि कर्मचारी सुरूच ठेवतील असा मला विश्वास आहे.

**मास्कची निर्मिती :**

मे महिना हा उन्हाळी सुट्ट्यांचा काळ. या वर्षी मार्च महिन्यापासूनच सुट्ट्या असल्याने मे महिन्यात शैक्षणिक कार्य थोडे मंदावले होते. या काळात विद्यार्थ्यांसाठी मास्क शिवण्याचा उपक्रम हाती घेतला. जिल्हा स्काऊट–गाईडच्या मदतीने तो राबविला. मी स्वतः या उपक्रमात सहभागी होऊन सुमारे ३०० मास्क घरी शिवले. जिल्ह्यात तयार झालेले सर्व मास्क एकत्रित करून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सुपूर्द केले आहेत. जिल्ह्यातील आश्रमशाळा, जिल्हा परिषद शाळा व वसतिगृहात राहणाऱ्या मुलांना ते मोफत वितरित केले जाणार आहेत. शाळा सुरू होतील तेव्हा प्रत्येक विद्यार्थ्याला गणवेश, पुस्तके यांसोबत मास्कचीही गरज भासणार आहे. जिल्ह्यात दोन लाखांहून अधिक विद्यार्थी असून, प्रत्येक विद्यार्थ्याला किमान दोन मास्क लागतील. त्यामुळे पुढे मोठ्या प्रमाणात भासणारी मास्कची गरज ओळखून जिल्ह्यातील पाच हजारांहून अधिक संख्येने असणाऱ्या शिक्षकांना मास्क तयार करण्याचे आवाहन केले आहे. शाळा सुरू झाल्यावर ऐनवेळी मास्कचा तुटवडा भासणार नाही आणि मास्क अभावी मुलांची शाळाही बुडणार नाही असे नियोजन आहे. जिल्ह्यातील शिक्षक मास्क शिवण्याच्या आवाहनाला प्रतिसाद देत असून अनेक शिक्षकांनी मास्क निर्मितीला सुरुवात केली आहे.

ऑनलाईन मीटिंग, कार्यशाळा, शाळा व गृहभेटीनंतर आता डिजिटल अभ्यास साहित्य (ई–कंटेंट) शिक्षकांना पुरविण्याचे नियोजन सुरू आहे. हे साहित्य सॉफ्ट फॉर्ममधील पुस्तक, इमेज, ऑडिओ आणि व्हिडिओ या स्वरूपात तयार करणे, अशा फोटो, व्हिडिओंचा संग्रह करणे व मोठ्या संख्येत निर्माण केलेले किंवा संग्रहित केलेले ई–साहित्य शिक्षक व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत.

अशा प्रकारे जिल्ह्यातील प्रत्येक गावापर्यंत, गावातल्या प्रत्येक शाळेपर्यंत आणि शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत शिक्षण पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे. डिजिटल माध्यमांच्या मदतीने एकही मूल शिक्षणापासून वंचित राहणार नाही, तसेच शाळाबाह्यही होणार नाही यासाठीच ही सारी धडपड सुरू आहे. यात सर्वांचा सहभाग, सहकार्य मिळत असले तरी अजून बरेच काम बाकी आहे.

■■■

# अपनी राजभाषा

**राजेंद्र वाकडे**
अभ्यासक्रम विकसन विभाग, एससीईआरटी महाराष्ट्र, पुणे.
भ्रमणध्वनी : ८८३०५३७४६७

१९४७ में अपना भारत देश अंग्रेजी हुकूमत से आजाद हुआ । ६ दिसंबर १९४६ में आजाद भारत का संविधान तयार करने के लिए संविधान का गठन हुआ। संविधान सभाने २६ नवंबर १९४९ को संविधान के अंतिम प्रारूप को मंजूरी दे दी । आजाद भारत का संविधान २६ जनवरी १९५० से पूरे देश में लागू हुआ ।

लेकिन संविधान सभा के सामने महत्त्वपूर्ण प्रश्न था कि भारत की राजभाषा, सरकारी कामकाज की भाषा कौन सी रहेगी । १४ सितंबर १९४९ को काफी विचार विमर्ष के बाद हिंदी भारत की राजभाषा और लिपी देवनागरी होगी, जिसे भारतीय संविधान के भाग १७ अध्याय की धारा ३४३ (१) में बताया गया हैं । यह निर्णय १४ सितंबर को लिया था, इसी महत्त्वपूर्ण निर्णय के महत्त्व को प्रतिपादित करने तथा हिंदी को हर क्षेत्र में प्रसारित करने के लिए राष्ट्रभाषा प्रचार समिती, वर्धा के अनुरोध पर वर्ष १९५३ से पूरे भारत में १४ सितंबर हिंदी दिवस के रूप में मनाया जाता हैं ।

> *जिस प्रकार किसी भी राष्ट्र की संप्रभुता एवं स्वाभिमान का प्रतीक राष्ट्रीय ध्वज एवं राज चिन्ह होता हैं, ठीक उसी प्रकार राष्ट्र की संस्कृती एवं भाषा भी गौरव और अस्मिता का प्रतीक होता है।*
>
> *१४ सितंबर हिंदी दिवस के अवसरपर अपनी राजभाषाके बारे में...*

जिस प्रकार किसी भी राष्ट्र की संप्रभुता एवं स्वाभिमान का प्रतीक राष्ट्रीय ध्वज एवं राज चिन्ह होता हैं, ठीक उसी प्रकार राष्ट्र की संस्कृती एवं भाषा भी गौरव और अस्मिता का प्रतीक होता है ।

भारत बहुभाषा भाषी राष्ट्र है । विस्तृत भू-भाग वाले इस राष्ट्र में कश्मीर से लेकर कन्याकुमारी तक और कच्छ से लेकर ब्रम्हपुत्र तक अनेक भाषाएँ एवं बोलियाँ बोली जाती है । किन्तु सांस्कृतिक दृष्टि से भारत एक इकाई है । विभिन्नता में एकता भारत की दुर्बलता न होकर शक्ति है । कश्मीरी, सिंधी, पंजाबी, हिंदी, राजस्थानी, गुजराती, मराठी, उडिया, असमिया, बंगला, तमिळ, तेलुगू, कन्नड, मलयालम जैसी समृद्ध भाषा भारत में बोली जाती है । फिर भी देश में हिंदी बोलनेवालों की संख्या अधिक है । उच्च कोटि का साहित्य, शब्द-भांडार, सरल और नियमबद्ध व्याकरण, लिपि सुस्पष्ट, व्यापक क्षेत्र, राष्ट्रीय संस्कृती का प्रतिनिधित्व इसी वजह से हिंदी भाषा राष्ट्रभाषा बनने की क्षमता रखती है ।

हिंदी को समृद्ध बनाने के लिए अनेक संस्था, पत्र-पत्रिकाएँ, साहित्यकारोंने अपना महत्त्वपूर्ण योगदान दिया है । इसमें आचार्य रामचंद्र शुक्ल, मिश्र बंधू, डॉ. रामकुमार वर्मा, आचार्य हजारी प्रसाद द्विवेदी आदि व्यक्तियों ने अपना महत्त्वपूर्ण योगदान दिया हैं ।

अमिर खुसरो, कबीरदास, सूरदास, जायसी, तुलसीदास, मीराबाई, महावीर प्रसाद द्विवेदी, मैथिलीशरण गुप्ता, महादेवी वर्मा, सूर्यकांत त्रिपाठी निराला, जयशंकर प्रसाद, मोहन राकेश, बाबू देवकीनंदन

खत्री, प्रेमचंद, फणीश्वरनाथ रेणु, भारतेन्दु इन महत्त्वपूर्ण व्यक्तियोंने हिंदी को चरम उत्कर्ष पर पहुँचाया है ।

हिंदी भाषा का अध्ययन–अध्यापन अपने राज्य में द्‌वितीय भाषा के रूप में किया जाता है । छात्रों में श्रवण, भाषण–संभाषण, वाचन, लेखन, भाषा व्याकरण, अध्ययन कौशल का विकास करने के लिए विविध कार्यक्रमों का आयोजन किया जाता हैं । छात्रों को ना सिर्फ हिंदी की तासिका में बोलने का मोका देना चाहिये बल्कि जिस प्रकार परिपाठ मराठी में होते हैं । उसी प्रकार हप्तो में दो बार परिपाठ करने के लिए छात्रों को मौका देना चाहिये । हिंदी दिवस के अवसर पर हिंदी में कार्यक्रम करते हैं, यह अच्छी बात हैं बल्कि जब मौका मिले तो ऐसे हिंदी में कार्यक्रमों का आयोजन करेंगे, बच्चे अच्छी तरह से सीखेंगे । हिंदी सप्ताह १४ सितंबर को हिंदी दिवस से एक सप्ताह के लिए मनाया जाता है । इस पूरे सप्ताह तथा पूरे सालभर अलग अलग प्रतियोगिता का आयोजन कर सकते हैं ।

१) शिक्षालयों में समय समय पर जो महापुरुषों के स्मृतिदिन, जयंती तथा ऐसेही सामयिक, नैमित्तिक उत्सव होंगे, उनमें उन महापुरुषों के जीवन के संस्मरणीय एवं उद्‌बोधक प्रसंगों के आधार पर कुछ निबंध लेखों का पठन करने या उनके विषय में भाषण देने छात्रों को प्रवृत्त किया जा सकता हैं ।

२) वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, पाठांतर स्पर्धा, काव्यगायन, नाट्‌यवाचन, प्रदर्शनी आदि बातों को भी सांस्कृतिक कार्यक्रम के विषय बनाया जा सकता हैं ।

३) पाठ्‌यपुस्तक में आए एकांकी अथवा वार्तालाप को शालेय रंगमंचपर प्रस्तुत किया जा सकता है । छात्रों के भाषण कौशल के विकास में यह उपक्रम उपयुक्त है । हावभाव का समुचित प्रयोग करने का अभ्यास इससे होता है ।

४) छात्र पाठ्‌यपुस्तक में संकलित कविताओं को कंठस्थ करते हैं । इनके गायन का कार्यक्रम आयोजित करें और कुशल छात्रों को पुरस्कार प्रदान करें ।

५) प्रत्येक कक्षा के छात्रों के लिए एक हस्तलिखित हिंदी पत्रिका या भित्तिपत्रिका प्रकाशित की जा सकती है। छात्रों के लेखन कौशल को विकसित करने में यह उपक्रम महत्त्वपूर्ण है ।

६) नाट्य वाचन के द्‌वारा छात्रों के पठन कौशल विकास सहजता से हो सकता है ।

७) आकाशवाणी पर प्रसारित काव्य, कथा, चर्चा, भेटवार्ता आदि हिंदी कार्यक्रमों का श्रवण करने के लिए प्रोत्साहित करना ।

८) हिंदी कथा–कथन प्रतियोगिता का आयोजन करके श्रेष्ठ रचना को पुरस्कृत करना ।

९) समानार्थक एवं विरुद्‌धार्थक शब्दों का संग्रह करना ।

१०) शब्द समूह के लिए एक शब्द का प्रयोग करना।

११) दैनिक व्यवहार में प्रयुक्त हिंदी शब्दों का संग्रह करना ।

१२) भाषा तथा व्याकरण के खेलों का आयोजन करना ।

१३) आदर्श वक्ताओं के भाषण उनके सामने प्रस्तुत किये जाये, जिससे उनके सामने भाषा शुद्‌धता, विचारो की नि:संदिग्धता, विवेचन की सुसूत्रता एवं तार्किकता, धारा प्रवाहिता, भाषण का उतार चढ़ाव आदि के संबंध में शिक्षक छात्रों को मार्गदर्शन कर सकेंगे ।

१४) पर्यटन एक महत्त्वपूर्ण अध्ययन अनुवर्ती उपक्रम है । बाह्य जगत में, स्वाध्याय से, स्वयं निरीक्षण से, स्वानुभव से, स्वयंशिक्षा से जो ज्ञान प्राप्त किया जाता है वह अधिक दृढ़ और अधिक टिकाऊ होता है ।

इस प्रकार विविध उपक्रमों का आयोजन करके छात्रों में हिंदी भाषा के कौशल का विकास कर सकते हैं ।

# ऑनलाईन शिक्षणाची संधी व आव्हाने

**ऊर्मिला हाडेकर**
राज्य विज्ञान शिक्षण संस्था तथा
प्रादेशिक विद्या प्राधिकरण, जि. नागपूर
भ्रमणध्वनी : ९४२१८१५९८८

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे मानवी जनजीवनातील प्रत्येक घटक प्रभावित झाला आहे. कोरोना विषाणूने जगभर हाहाकार माजवला असून परिस्थिती अजूनही नियंत्रणात नाही. त्यामुळे पारंपरिक पद्धतीने शालेय शिक्षण पुन्हा कधी पूर्ववत होईल सांगता येत नाही. कोरोना काळात शिक्षण आणि शिक्षण पद्धती याविषयी अनेक अडचणी व प्रश्न निर्माण झाले, पण या संकटामुळे भविष्यातील शालेय शिक्षणात बदल घडविण्याची संधी सुद्धा आपल्याला प्राप्त झाली आहे. यानंतर पुढील पिढ्या नेमके काय आणि कसे शिकणार, शाळा नेमकी कशी असणार याविषयी विचार करण्याची व भविष्यासाठी आराखडा तयार करण्याची वेळ आपल्यावर आली आहे. यामुळे भविष्यात अशा प्रकारचे संकट आलेच तर आपल्यासमोर काही पर्याय निश्चितपणे असतील.

> *राज्य विज्ञान शिक्षण संस्था तथा प्रादेशिक विद्या प्राधिकरण या संस्थेने ऑनलाईन पद्धतीने विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू ठेवण्यासाठी, शिक्षकांना तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्याची आवश्यकता लक्षात घेऊन, शिक्षकांसाठी ई-साहित्य निर्मितीचे प्रशिक्षण, ई-साहित्य निर्मितीसाठी तंत्रज्ञानाचा उपयोग, विविध ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर यांविषयी ऑनलाईन प्रशिक्षणे आयोजित केली. त्याविषयी...*

मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून लॉकडाऊन सुरू झाले, तसे शाळांमधील इयत्ता नववी पर्यंतचा काही अभ्यासक्रम व परीक्षा होऊ शकल्या नाहीत, पण राहिलेला अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी शिक्षकांनी व्हॉट्सॲपचा आधार घेतला. नेहमीसारख्या शाळा सुरू होऊ शकत नाहीत हे लक्षात आल्यावर संपूर्ण जगात अनेक शाळांनी ऑनलाईन शिक्षण देण्यास सुरुवात केली. पहिल्यांदाच अशा संकटाला आपण तोंड देत आहोत. त्यामुळे ऑनलाईन शिक्षणासाठी शाळांकडे किंवा शिक्षकांकडे वर्गानुसार, विषयानुसार, संकल्पनांनुसार ई-साहित्य तयार असणेही गरजेचे होते. मग ते ई-साहित्य व्हिडिओच्या स्वरूपात असेल, दस्तावेज असेल, प्रश्नावली असेल, चित्राच्या स्वरूपात असेल, गोष्टीच्या स्वरूपात असेल किंवा कार्टूनचे संवाद या स्वरूपात असेल. हे सर्व तयार करणे एक प्रकारचे आव्हानच होते. ज्यांना टेक्नॉलॉजीबद्दल ज्ञान आहे, त्यांनी लगेच कामाला सुरुवात केली. ज्यांना याबद्दल थोडेफार ज्ञान आहे त्यांनी आणखी शिकण्यासाठी विविध प्रकारचे प्रशिक्षण घेऊन किंवा यू-ट्यूबचे व्हिडिओ पाहून टेक्नॉलॉजीचा शिक्षणात प्रभावी उपयोग करण्याचा प्रयत्न केला आणि ते मुलांपर्यंत पोहोचले. काही शिक्षकांना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचता आले परंतु हे सर्व प्रयत्न प्रथमच होत असल्यामुळे त्यातून अनेक अडचणी निर्माण झाल्या व त्या कशा सोडवाव्यात हे आव्हान समोर आले. जसे...

- ऑनलाईन शिक्षण हे एकतर्फी चालणारे शिक्षण आहे, त्यामुळे वेळीच मुलांच्या शंकांचे निरसन एकाच वेळी शिक्षक करू शकतील का?
- ऑनलाईन शिक्षण, शिक्षणाची योग्य पद्धत होईल का?

- ऑनलाईन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचे स्वयं-अध्ययन होईल काय?
- मुलांना चांगल्या पद्धतीने अध्ययन करता यावे यासाठी कोणते तंत्रज्ञान वापरले तर फायद्याचे ठरेल?
- प्रत्येक विद्यार्थ्याच्या जवळ ऑनलाईन शिक्षण घेण्यासाठी पायाभूत सुविधा (मोबाईल, संगणक, Tab, laptop) उपलब्ध असतील का?
- प्रत्येक विद्यार्थ्यांजवळ जरी पायाभूत सुविधा उपलब्ध असल्या तरी इंटरनेटची उपलब्धता होईल का?
- विद्यार्थ्यांच्या घरी नियमित विद्युत पुरवठा असेल का?
- घरात दोन मुले शिक्षण घेणारी असतील आणि पालकांकडे एकच मोबाईल असेल तर दोघांना एकाच वेळी शिकता येईल का?
- या पद्धतीत विद्यार्थी ते शिक्षक व शिक्षक ते विद्यार्थी असा थेट संपर्क नसेल, तर विद्यार्थ्यांची एकाग्रता टिकविणे कठीण आहे आणि एकाग्रता टिकविल्याशिवाय अभ्यास कसा होणार?
- तासन्तास मोबाईल किंवा संगणकावर बघत बसणे असे ऑनलाईन शिक्षण असेल, तर यावर मार्ग काय?
- शिक्षक ज्या सॉफ्टवेअर ॲप्लिकेशनचा उपयोग करून शिक्षण देत असतील आणि त्याला सपोर्ट करणारी उपकरणे विद्यार्थ्यांकडे नसतील तर कसे?
- काही विद्यार्थ्यांना गटात अध्ययन, सहाध्यायी अध्ययनाची सवय झालेली आहे. ऑनलाईन शिक्षण त्यांची ही गरज पूर्ण करू शकेल काय?
- विद्यार्थ्यांची क्षमता, कुवत लक्षात घेऊन आणि त्यांना येईपर्यंत शिक्षकाने विविध अध्यापन पद्धतींचा उपयोग करून शिकवायचे असेल तर ऑनलाईन शिक्षण हा पर्याय असू शकेल काय?
- लहान विद्यार्थ्यांच्या बाबतीत पालकांच्या मदतीने ऑनलाईन शिक्षण होणे गरजेचे आहे. अशा वेळी पालक वेळ देऊ शकतील काय?
- ऑनलाईन शिकण्यासाठी इंटरनेट सुविधेसह मुलांच्या हातात मोबाईल आल्यामुळे अभ्यासा-व्यतिरिक्त इतर अनावश्यक साईट्स पाहणे किंवा गेम खेळणे याकडे मुले वळण्याची शक्यता नाकारता येईल का?
- विद्यार्थ्यांचे अवधान टिकवून ठेवण्यासाठी ऑनलाईन शिक्षणामध्ये विविधता आणता येईल काय?
- विद्यार्थ्यांच्या वर्गानुसार, विषयानुसार, घटकानुसार ठरवून दिलेल्या अध्ययन निष्पत्ती साध्य होऊ शकतील का?
- ऑनलाईन शिकविले जात आहे, पण त्यात किती शिकविले जाते याचे मोजमाप कसे करणार?
- शिक्षणामध्ये शारीरिक श्रम आणि उत्पादक श्रम या गोष्टींना सुद्धा खूप महत्त्व आहे आणि स्पर्धेला नव्हे, तर सहकार्याला प्राधान्य आहे. यासाठी ऑनलाईन शिक्षण हा पर्याय कसा असू शकेल?
- ऑनलाईन शिक्षणाला शालेय वातावरणातील शिक्षणाची सर येईल का?

यात आणखी व्यक्तिपरत्वे व परिस्थितीपरत्वे आव्हानांची यादी मोठी होऊ शकते. प्रत्यक्ष अध्यापनामध्ये विद्यार्थ्यांच्या आकलनावर अधिक भर दिला जातो. विषय समजला की नाही याचा पडताळा शिक्षकांना लगेच प्रश्नोत्तरांतून, चर्चेतून, विद्यार्थ्यांच्या मिळालेल्या प्रतिसादातून, अनौपचारिक संवाद साधून किंवा विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील हावभाव यातून जाणून घेता येतो. ऑनलाईन शिक्षणामुळे या सर्वांवर मर्यादा आलेल्या आहेत. अध्यापन-अध्ययन प्रक्रियेबाबत, भौतिक सुविधांबाबत, पालकांच्या आर्थिक स्थितीबाबत,

 ११ सप्टेंबर : आत्माराम रावजी देशपांडे तथा कवी अनिल जन्मदिन (१९०१)

तंत्रज्ञानाबाबत, शिक्षक, विद्यार्थी व पालकांच्या मानसिकतेबाबत अशी अनेक आव्हाने असल्याचे आपल्याला दिसून येत आहे. अशा आव्हानांवर पूर्णपणे तर नाही, परंतु काही प्रमाणात मात करण्यात आपण यशस्वी झालो आहोत.

राज्य विज्ञान शिक्षण संस्था तथा प्रादेशिक विद्या प्राधिकरण, नागपूर, विज्ञानाचा प्रचार व प्रसारासाठी तसेच विज्ञान विषयातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीच्या दृष्टीने काम करणारी संस्था आहे. या संस्थेमार्फत विज्ञान विषयाच्या विविध योजना राबविल्या जातात. कोरोना काळात एस.सी.ई.आर.टी. मार्फत 'शाळा बंद पण शिक्षण सुरू' या उपक्रमासोबतच प्रस्तुत संस्थेने पुढाकार घेऊन 'सायन्स लर्न फ्रॉम होम' हा उपक्रम सुरू केला. गुगल लिंकच्या माध्यमातून प्रश्नावली तयार करून शिक्षक आपल्या मुलांसाठी नेमके काय करीत आहेत? मुलांचा प्रतिसाद कसा मिळत आहे? शिक्षकांकडे तंत्रज्ञानाचे अद्ययावत ज्ञान आहे की नाही? पालकांचा प्रतिसाद कसा आहे? तंत्रज्ञानाच्या अद्ययावत ज्ञानासाठी प्रशिक्षणाची गरज आहे काय? अशा प्रकारच्या १५ प्रश्नांची लिंक देऊन ऑनलाईन शिक्षणाची सद्य:स्थिती जाणून घेण्यात आली. विद्यार्थ्यांचे शिक्षण ऑनलाईन पद्धतीने सुरू ठेवण्यासाठी शिक्षकांना प्रेरणा देण्याची व त्यांना अद्ययावत तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्याची आवश्यकता लक्षात घेण्यात आली. शिक्षकांना ई-साहित्य निर्मितीचे प्रशिक्षण व ई-साहित्य निर्मितीसाठी तंत्रज्ञानाचा उपयोग, विविध ॲप्लिकेशन, सॉफ्टवेअर यांविषयी शिक्षकांसाठी या काळात ऑनलाईन प्रशिक्षणे आयोजित करण्यात आली. त्याला राज्यातील शिक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. अगस्त्या इंटरनॅशनल फाऊंडेशन कुप्पम, आंध्रप्रदेश या संस्थेसोबत 'प्रयोगातून विज्ञान' याविषयी चार दिवसीय राज्यस्तरीय शिक्षक प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला; ज्यात मागील वर्षभरात अगस्त्या इंटरनॅशनल फाऊंडेशन कुप्पम, आंध्र प्रदेश येथे जाऊन प्रत्यक्ष प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांना सहभागी करून घेण्यात आले. यात कठीण संकल्पना सोप्या पद्धतीने समजून घेणे, परिसरात उपलब्ध असलेल्या साहित्याचा उपयोग करून कृती, प्रयोग करणे तसेच वर्गातील विज्ञान-अध्यापन अधिक सुकर कसे होईल यांवर भर देण्यात आला. ऑनलाईन शिक्षणाचे महागडे ॲप्स सामान्य विद्यार्थी व पालकांना परवडू शकत नाहीत, परिणामी ते शिक्षणापासून वंचित राहतील. असे होऊ नये म्हणून उत्तम दर्जाची ऑनलाईन शैक्षणिक साधने शिक्षकांच्या सहकार्याने तयार करण्याची प्रक्रिया संस्थेमार्फत सुरू आहे. कृती, प्रयोग, कुतूहल, संशोधन, निरीक्षण, अनुमान, वर्गीकरण, विश्लेषणात्मक व चिकित्सक विचारप्रक्रिया या सर्वांमधून विज्ञान विषयाच्या संकल्पना समजल्या जातात. हे सर्व ऑनलाईन शिक्षणातून पूर्ण करण्यासाठी त्या प्रकारचे ई-साहित्य तयार करणे हा विचार लक्षात घेण्यात आला आणि त्याप्रमाणे प्रयोग, प्रकल्प, विज्ञान संकल्पनेवर आधारित व्हिडिओ, ॲक्टिव्हिटिज, प्रश्नावली, इंटरॲक्टिव्ह ई-साहित्य, गोष्टी, कोडी, विज्ञान नाटिका यांसारखे विविध साहित्य निर्मितीचे कार्य सुरू आहे. हे सर्व साहित्य विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात येईल. मे महिन्यात विद्यार्थ्यांसाठी डिजिटल समर कॅम्प सारख्या संकल्पना राबविण्यात आल्या, ज्या अंतर्गत शिक्षकांनी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये समाविष्ट करून घरातील बैठे खेळ, कला, कोडी, गोष्टी, गाणी, रांगोळी, चित्रकला, कागद-काम, कचऱ्यातून कला यांसारखे रोज एक काम देऊन ते करून घेतले. यातून विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवणे व घरात राहूनही त्यांना नवनिर्मितीचा आनंद देणे हे उद्दिष्ट साध्य करण्यास मदत झाली. अर्थात जेथे मुले सहभागी होऊ शकली नाहीत तेथे शेजारच्या मित्रांकडून त्या दिवसाचा दिलेला task त्यांनी माहीत करून घेतला व ज्या मुलांकडे साधा फोन आहे त्यांना text मेसेज पाठविण्यात आले. शिक्षकांनी त्यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधला. यासाठी

अगस्त्या इंटरनॅशनल फाऊंडेशनमार्फत सुरू असलेल्या विज्ञान केंद्रातील शिक्षकांची मदत झाली.

ऑनलाईन शिक्षण पद्धत ही परिपूर्ण नाही हे जरी खरे असले तरी लहान मुलांसाठी मात्र ही पद्धत काही अंशी फार फायदेशीर ठरत आहे. शाळेत जाण्यासाठी घर ते शाळा हे अंतर पार करून जाणे, त्यासाठी लागणारा वेळ व प्रवासातील धोके टाळायला मदत झाली. त्यानंतर घर ते शाळा या प्रवासात कधी कधी दुर्दैवाने मुले लैंगिक छळवणुकीला बळी पडण्याच्या घटना घडतात. सकाळची शाळा असेल तर लवकर उठून शाळेची तयारी मुले स्वतंत्रपणे करू शकत नाहीत. अशा वेळेस पालकांना त्यांच्यासाठी वेळ द्यावा लागतो. ऑनलाईन शिक्षण पद्धतीमुळे पालकांच्या देखरेखीखाली घरच्या सुरक्षित वातावरणात मुले शिकत असल्यामुळे आरोग्यविषयक प्रश्न सोडविण्यास सुद्धा मदत होत आहे. इंटरनेटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ज्ञानाचे भांडारच उपलब्ध झाले आहे. त्यामुळे पाहिजे तेव्हा, पाहिजे तसे एखाद्या आवडीच्या विषयाचे व्हिडिओ पाहता येतात किंवा माहिती मिळविता येते.

विद्यार्थ्यांसाठी 'दिक्षा ॲप्लिकेशन', दूरदर्शनवरील शैक्षणिक कार्यक्रम, रेडिओवरील कार्यक्रम, टीली मिली, गलीगली, सिमसिम, 'शाळे बाहेरील शाळा' यांसारखे शैक्षणिक कार्यक्रम शासनाने उपलब्ध करून दिलेलेच आहेत. या सोबतच शिक्षक स्वत: आपल्या वर्गासाठी ऑनलाईन माध्यमातून संवाद साधत आहेत. या काळात मुलांशी संपर्क तुटू द्यायचा नाही, असे शिक्षकांनी ठरविले आणि प्रत्येक वर्गशिक्षक फोन करून विद्यार्थ्यांच्या संपर्कात राहू लागले, त्यामुळे मुलांची खुशाली कळत होती. पालकांना विश्वासात घेऊन सध्याच्या काळात ऑनलाईन शिक्षण पद्धती शिवाय पर्याय नाही हे शिक्षकांनी पटवून दिले. आपल्या पाल्याचे शिक्षण अधिकाधिक सुकर कसे होईल, यावर पालक भर देऊ लागले असून ते एसएमएस सेवा, टी.व्ही. आणि रेडिओ सारख्या माध्यमांचा अधिक खुलेपणाने वापर करू लागले आहेत. असेही होऊ शकते की, मुले स्व–अभ्यासात स्वतःला गुंतवू पाहतील किंवा नवीन छंद जोपासतील अथवा वेळापत्रकाच्या दृष्टिकोनातून प्रत्येक गोष्टीकडे न पाहता नवनवीन गोष्टी शिकण्याकडे कल वाढवू शकतील. या पद्धतीमुळे स्वयं अध्ययनाला वाव मिळणार आहे. मोबाईल सारख्या खूप आकर्षक अशा वस्तू समजून घेणे, आज कोणता अभ्यास करायचा आहे हे स्वत:हून पाहणे व त्याप्रमाणे अभ्यास करणे. आपल्या इतर सहकारी मित्रांकडे मोबाईल नसेल तर त्यांनाही मदत करणे, व्यक्ती–व्यक्तींमधील सहसंबंध वाढविणे, स्वयं–अध्ययन, 'स्व' चे भान, परिणामकारक संवाद, स्वयंलेखन, जबाबदारीची जाणीव, मिळालेल्या वेळेचा सदुपयोग, अचानक आलेल्या संकटामुळे खचून न जाता त्यातून मार्ग काढणे, स्वतःच्या भावनांचे व्यवस्थापन करणे इत्यादी कौशल्ये विकसित करण्याची संधी मिळणार आहे.

कोविड–१९ या संकटाचा सुरुवातीचा काळ फार गोंधळाचा होता. या अशा परिस्थितीला यापूर्वी आपण कोणीच सामोरे गेलेलो नव्हतो. अचानक आलेले हे संकट प्रत्येक क्षेत्राला संभ्रमावस्थेत टाकणारे होते. त्याला तोंड कसे द्यायचे, हे सगळ्यांनाच नव्याने शिकायला लागणार होते. साहजिकच शिक्षणक्षेत्रही त्याला अपवाद नव्हते. त्यामुळे आव्हाने, संकटे, समस्या यांवर मात करून काही प्रमाणात तरी मुलांपर्यंत शालेय शिक्षण पोहोचविण्याची संधी आपल्याला ऑनलाईन शिक्षणाने दिली. कोरोनानंतरच्या काळातही आर्थिक आणि शैक्षणिक दृष्ट्या दुर्बल मुलांना औपचारिक शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवणे ही शिक्षकांची, शासनाची आणि समाजाची खरी जबाबदारी असणार आहे. माणसांनी निसर्गावर आरूढ होणे नव्हे, तर निसर्गासोबत सहकार्याच्या भावनेतून जगणे खूप महत्त्वाचे आहे. शिक्षणातून याचे भान येणे अपेक्षित आहे. ही एक महत्त्वाची शिकवण या कोविड काळात आपल्या सर्वांनाच मिळाली आहे. त्यामुळे उज्ज्वल भविष्यकाळाची प्रसन्न सकाळ लवकरच उगवेल अशी आशा करू या!

■■■

# ओट्यावरची शाळा

**प्रकाश चव्हाण**
जि. प. शाळा करंजवण, ता. दिंडोरी, जि. नाशिक
भ्रमणध्वनी : ९९६०१२५९८१

कोविड–१९ या विषाणूमुळे संपूर्ण जगात सगळे व्यवहार ठप्प झाले. १५ मार्च २०२० पासून शासनाच्या आदेशानुसार महाराष्ट्रातील सर्व शाळा बंद करण्यात आल्या आणि शिक्षणाच्या गंगेचा प्रवाह रोखला गेला. परीक्षा झाल्या नव्हत्या. मुलांचा सराव बाकी होता. अशा वेळी विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी विविध मार्ग शोधण्याचे प्रयत्न सुरू झाले. या काळात विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहू द्यायचे नाही ही पक्की खूणगाठ बांधून आम्ही जि. प. प्राथमिक शाळा करंजवण ता. दिंडोरी, जि. नाशिक येथे सुरू केला एक नावीन्यपूर्ण उपक्रम 'ओट्यावरची शाळा'.

> *इच्छा असली की मार्ग सापडतो असे म्हणतात. ऑनलाईन शिक्षण सुरू झाल्यावर, करंजवण जि. प. शाळा, साधा मोबाईल असणाऱ्यांसाठी, स्मार्टफोन असणाऱ्यांसाठी वेगवेगळ्या प्रकारे शिक्षण देण्याचा प्रयत्न करीत आहे. ज्यांच्याकडे फोनच नाही त्यांच्यासाठी ४/४ जणांच्या गटात अभ्यास मित्र कल्पना राबवून, तर काही ठिकाणी ओट्यावरचा मार्गदर्शन वर्ग सुरू करून शिक्षण चालू ठेवले आहे. अडचणींचा बाऊ न करता मार्ग काढण्याच्या या प्रयत्नांविषयी...*

कोणताही उपक्रम प्रभावीपणे राबवायचा असेल तर उद्दिष्टे डोळ्यांसमोर असणे गरजेचे असते. यासाठी मी खालील उद्दिष्टांना प्राधान्य देण्याचे ठरविले :

१) विद्यार्थ्यांना छोटे छोटे विषय देऊन त्याविषयी त्यांना स्वत:चे विचार मांडायला लावणे.

२) विद्यार्थ्यांना शिकण्याच्या प्रक्रियेतील आनंद मिळवून देणे.

३) एकाच साहित्यातून वेगवेगळ्या अध्ययन घटकांची ओळख करून देणे.

४) अध्यापनात डिजिटल साहित्याचा प्रभावी वापर करीत त्याच्या साहाय्याने शिक्षण सुरू ठेवणे.

माझ्या इयत्ता तिसरी ब या वर्गातील २८ मुलांपैकी फक्त १० विद्यार्थ्यांकडे Whatsapp असलेले android मोबाईल व ८ पालकांकडे साधे मोबाईल होते आणि १० विद्यार्थ्यांच्या पालकांकडे संपर्काचे कोणतेच साधन नव्हते. अशा वेळी विविध गटांतील मुलांना एकसारखा अभ्यास देणे शक्य नव्हते व विद्यार्थ्यांच्या दृष्टीने न्याय्यही नव्हते. मग मी माझ्या शाळेतील मुलांसाठी अभ्यासाचे नियोजन खालीलप्रमाणे केले :

सर्व विद्यार्थ्यांसाठी विषयनिहाय लॅमिनेशन कार्ड्स तयार केली. या कार्ड्सवर जेलपेनने एकदा केलेला अभ्यास सोडविला की पुसता येतो व पुन्हा त्यावर नवीन अभ्यास करता येतो. अशा रीतीने दररोज या कार्डांची एकमेकांमध्ये विषयनिहाय देवाणघेवाण करण्यास सांगितले. त्यामुळे देवाणघेवाण करण्याची सवय मुलांमध्ये विकसित झाली. त्याचबरोबर मुलांना स्वत: वाचून स्वाध्याय सोडविता येतील अशा दर्जेदार स्वयंनिर्मित स्वाध्याय पुस्तिका तयार करून सर्व मुलांना त्याचे मोफत वाटप केले. कोविड–१९ काळात

पालकांना कोणताही आर्थिक भुर्दंड पडू नये हा माझा त्या मागचा प्रयत्न होता. महाराष्ट्रातील अनेक शिक्षकांना त्या पुस्तिकेच्या pdf व्हॉट्सअॅप द्वारे पाठविण्यात आल्या आहेत. रोजच्या रोज मुलांना अभ्यास देता येत असल्याने पालकही या उपक्रमाला मोठ्या प्रमाणात सहकार्य करीत असून ते मुलांकडून तो अभ्यास करून घेत आहेत.

वर्गातील १० मुलांसाठी झूम मीटिंग द्वारे दररोज सायंकाळी ७ ते ८.३० या वेळेत ऑनलाईन शाळा सुरू केली आहे. या मुलांना पाठ्यक्रमातील घटकांचे क्रमाक्रमाने अध्यापन करीत आहे. मुलांसाठी प्रत्येक पाठ्यघटकावर व्हिडिओ बनवून whatsapp वर पाठविले जातात. ज्या ८ मुलांकडे साधा मोबाईल आहे त्यांना दररोज फोन करून व टेक्स्ट मेसेजद्वारे दैनिक अभ्यास दिला जातो. ग्रुप कॉन्फरन्स कॉल करून मुलांची एकमेकांशी आंतरक्रिया घडवून आणली जाते.

उर्वरित १० विद्यार्थ्यांपैकी ७ विद्यार्थ्यांची घरे जवळजवळ असल्याने त्यांना एकमेकांचे अभ्यासमित्र बनविले आहे. या मुलांचे दोन गट तयार केले आहेत. त्यांना शिकविण्यासाठी बारावीची एक विद्यार्थिनी शीतल व एका विद्यार्थ्याची आई यांना स्वयंसेवक म्हणून नेमण्यात आले आहे. मुलांना शिकविण्यासाठी त्यांना २' × २' चे प्लायवूडचे फळे व खडू बॉक्स देण्यात आले आहेत. हे स्वयंसेवक दररोज विद्यार्थ्यांना स्वयंस्फूर्तीने शिकवितात. ३ विद्यार्थी मामाकडे शिकायला आलेले होते, पण लॉकडाऊनमुळे अजून ते करंजवणला परतलेले नाहीत. त्या ठिकाणी त्यांच्यासाठी शिक्षणाचा कोणताच पर्याय मात्र उपलब्ध नाही कारण मुलांच्या आई-वडिलांकडे संपर्क साधण्यासाठी कोणतेच साधन नाही, पण त्या मुलांसाठी लागणारे अध्ययन साहित्य मुलांच्या आजी-आजोबांकडे पाठविण्यात आले आहे.

अँड्रॉईड मोबाईल नसलेल्या मुलांसाठी आठवड्यातून दोन दिवस शाळेत जाऊन शाळेतील ओट्यावर बसून मुलांचा प्रत्यक्ष अभ्यास घेतो. या मुलांचे ४ गट आहेत त्या प्रत्येक गटासाठी एक फळा तयार करून देण्यात आलेला आहे. त्या फळ्यावर मुलांना ओट्यावर मिळेल त्या जागेवर बसून शिक्षण दिले जाते. उर्वरित दिवसात मुले शेजारी राहणाऱ्या मित्रांकडून दिलेला अभ्यास घेतात.

मुलांना शिकणे सोपे व्हावे या दृष्टिकोनातून मुलांसाठी मी Android apps तयार केले असून मराठी, गणित, इंग्रजी विषयांचे दर्जेदार apps प्ले-स्टोअर वर मोफत उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत, ज्यांचा वापर हजारो पालक व विद्यार्थी स्वयं-अध्ययनासाठी करीत आहेत.

याचबरोबर जिल्ह्यातील व राज्यातील शिक्षकांसाठी सुट्टीच्या काळात मी Youtube Live, Facebook Live, Zoom मीटिंग व गुगल मीटिंगद्वारे तंत्रज्ञानाच्या तसेच app निर्मिती, ppt गेम शो निर्मिती, ऑनलाईन शिक्षणाचे पर्याय यांवर आधारित राज्यभरातील शिक्षकांच्या कार्यशाळा घेतल्या आहेत. त्यामधून ऑनलाईन व ऑफलाईन शिक्षणाच्या पर्यायांचा प्रभावीपणे वापर कसा करावा याबद्दल शिक्षकांना प्रशिक्षित केले आहे.

नाशिक डायट व जि. प. नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील प्रत्येक शिक्षकाला झूम मीट, गुगल मीट इ. तंत्रज्ञानात समृद्ध करण्यासाठी दि. १० जुलै ते २४ जुलै दरम्यान दररोज ५ तास झूम मीटिंगद्वारे गुगल मीट, झूम मीट, जिओ मीट, गुगल क्लासरूम, कॉन्फरन्स कॉल याबाबतीत सर्व सेटिंग यांच्या कार्यशाळा घेतल्या आहेत.

*जे जे आपणास ठावे, ते ते सर्वांना द्यावे ।*
*समृद्ध करावे गुरुजन ॥*

या उक्तीप्रमाणे माझे कार्य सुरू आहे.

या कार्यात मला शाळेतील सर्व शिक्षकांनी सतत प्रोत्साहन दिले. डायट नाशिकच्या प्राचार्या, जिल्हा शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक यांनी नेहमीच प्रेरणा दिली आहे.

 १५ सप्टेंबर : भारतात दिल्ली येथून दूरदर्शन कार्यक्रम प्रसारणास प्रारंभ (१९५९)

# ऑनलाईन विज्ञान - जीवनानुभूती

**शिल्पा कारंडे**
स्वामी मुक्तानंद हायस्कूल, चेंबूर, मुंबई.
भ्रमणध्वनी : ९८६९०२०२७२

**इयत्ता : ९ वी, विषय : विज्ञान व तंत्रज्ञान,**
**पाठाचे नाव : वनस्पतींचे वर्गीकरण**

**प्रस्तावना :**

खरे पाहता विज्ञान हा रुक्ष, कठीण किंवा कंटाळवाणा वाटणारा विषय मुळीच नाही. उलट प्रयोगातून, कृतीतून अनुभूती घेण्याचा विषय आहे. केवळ वैज्ञानिक माहिती विद्यार्थ्यांना न देता, याच विषयातून आपल्याला त्यांची जिज्ञासू वृत्ती वृद्धिंगत करता येते. इतकेच नव्हे तर, जीवनमूल्यांची देखील अनुभूती देता येते. विज्ञानातून ही जीवनमूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी जीव–शास्त्राची, वनस्पती शास्त्राची, पर्यावरण शास्त्राची ओळख करून देणे आवश्यक आहे. मुलांमध्ये त्या विषयाची रुची निर्माण होणे गरजेचे आहे.


> *अचानक आलेल्या कोरोनाच्या आपत्तीमुळे शिक्षण प्रक्रियेत ऑनलाईन शिक्षणाचा पर्याय आला. आधुनिक, प्रगत तंत्रज्ञान आत्मसात करण्याशिवाय पर्याय नाही हे जाणवले. परिस्थिती बदलली म्हणून हातपाय गाळून चालणार नाही, आपणही बदल स्वीकारून सक्षम व्हायला पाहिजे. सक्षम सजीवच जगण्यास लायक असतो या डार्विनच्या सिद्धांतानुसार आपल्यात बदल घडविला पाहिजे हे जीवनमूल्य ऑनलाईन पाठ घेण्याच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या मनात रुजण्यास कशी मदत झाली त्याविषयी...*

आपल्या पृथ्वीतलावर वनस्पतींमध्ये बरेच वैविध्य आढळते. आतापर्यंत सुमारे ४० लक्ष वनस्पतींची नोंद शास्त्रज्ञांनी केली आहे. त्यामध्ये सूक्ष्म वनस्पतींपासून महाकाय वृक्षांपर्यंत विविध प्रकारच्या वनस्पतींचा समावेश आहे. एवढी प्रचंड संख्या व असंख्य प्रकार असल्याने वैज्ञानिकांनी या सर्व वनस्पतींचे वर्गीकरण केले आहे. या वर्गीकरणात जाती–प्रजाती, कुल, गुण, वर्ग व विभाग या गोष्टींचा विचार केला जातो.

इयत्ता नववीचे वनस्पतींचे वर्गीकरण (Classification of plants) हे प्रकरण सध्याच्या लॉकडाऊनच्या काळात ऑनलाईनच्या तासिकेमध्ये कसे शिकवायचे, हा मोठा प्रश्न होता. मग त्यासाठी ज्ञानरचनावादावर आधारित विद्यार्थ्यांच्या पूर्वज्ञानाचा, त्यांच्या निरीक्षणशक्तीचा आधार घेत हे प्रकरण शिकविण्याचा मी प्रयत्न केला. मुंबईतील अनेक विद्यार्थी गावी गेल्याने मला एक सुवर्णसंधीच मिळाली. त्यासाठी विद्यार्थ्यांना घराजवळील, शिवारातील आणि शेतातील वनस्पतींचे निरीक्षण करायला सांगितले व त्यातूनच या पाठाच्या अध्ययन–अध्यापनामध्ये अधिक रंजकता आली.

**उद्दिष्टे :**

शहरात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना वनस्पतींची, झाडांची तशी ओळख कमीच असते. त्यांच्या आसपास जरी वनस्पती असल्या तरी प्रत्यक्ष ओळख नसल्याने त्या वनस्पतींची विस्तृत माहिती मुलांना नसते. तेव्हा वनस्पतींचे वर्गीकरण हा पाठ शिकविण्यामागे मी खालील उद्दिष्टे निश्चित केली :




१) लॉकडाऊनमुळे गावी गेलेल्या विद्यार्थ्यांना आसपास आढळणाऱ्या वनस्पतींचे बारकाईने निरीक्षण करून, पाठाच्या व माझ्या अध्यापनाच्या अनुषंगाने वर्गीकरण करण्यास शिकविणे.

२) विद्यार्थ्यांमध्ये सूक्ष्म निरीक्षणातून वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणे तसेच त्यांच्यामधील जिज्ञासू वृत्ती जागृत करणे.

३) विद्यार्थ्यांमध्ये वनस्पतींबद्दल आवड निर्माण करून आपल्या जीवनातील पर्यावरणाचे महत्त्व पटवून देणे.

४) पर्यावरणातील सूक्ष्म वनस्पतींची, त्यांच्या प्रत्येक घटकाची माहिती पाठाच्या अनुषंगाने विस्तृतपणे सांगणे. वातावरण, परिस्थिती यानुसार त्या वनस्पतींच्या अनुकूलनाचे महत्त्व पटवून देऊन, त्याची सांगड जीवनमूल्यांशी घालून, विद्यार्थ्यांमध्ये ती रुजविणे.

### उपक्रम करताना आलेल्या अडचणी :

उपरोक्त उद्‌दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून वनस्पतींचे वर्गीकरण या पाठाचे अध्यापन विद्यार्थ्यांच्या पूर्वज्ञानाच्या अनुषंगाने करण्यास सुरुवात केली परंतु असे लक्षात आले की,

१) स्पायरोगायरा, रिक्सिया यांसारख्या वनस्पती मुलांच्या आजूबाजूला असून देखील विद्यार्थी त्या ओळखू शकत नाहीत. विद्यार्थी पूर्णत: अनभिज्ञ असल्याने पूर्वज्ञानाच्या अभावामुळे पाठाच्या अध्यापनास सुरुवात करतानाच थोडी अडचण आली.

२) ऑनलाईन तासिका घेताना थोड्या मर्यादा पडतात म्हणूनच मी स्वतः माझ्या सभोवतालच्या वनस्पतींचे नमुने घेऊन शिकविण्यास सुरुवात केली. झूमच्या माध्यमातून त्या वनस्पती मुलांना दाखविल्या, तरीही मुलांना त्याचे पूर्ण आकलन न झाल्याने वर्गीकरण करता येणे शक्य झाले नाही.

३) वर्गात प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना जी वनस्पती निरीक्षणाची अनुभूती आम्ही देऊ शकतो, ती ऑनलाईन तासिकांमुळे देता आली नाही.

४) पुस्तकामध्ये दिलेल्या त्या वनस्पतींच्या चित्रांमध्ये व प्रत्यक्ष त्या वनस्पतींमध्ये खूप मोठी तफावत आढळते. त्यामुळे नुसती पुस्तकातील चित्रे बघण्यास सांगून किंवा ऑनलाईन तासिकेमध्ये पुस्तकातील वनस्पतींच्या चित्रांच्या इमेजेस विद्यार्थ्यांना दाखवून सुद्धा त्यांना आकलन झाले नाही.

### अडचणी दूर करण्यासाठी केलेली कार्यवाही :

सदर पाठाचे अध्यापन करते वेळी आलेल्या या अडचणी लक्षात घेऊन, त्या दूर करण्यासाठी

ज्ञानरचनावाद पद्धतीचा अवलंब करण्याचे निश्चित केले. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून इयत्ता सहावी व शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून इयत्ता सातवी व नववी या इयत्तांची पाठ्यपुस्तके नव्याने तयार करण्यात आली आहेत. त्यानुसार विज्ञानाचे पाठ्यपुस्तक तयार करताना जो प्रमुख मुद्दा विचारात घेतला होता, तो म्हणजे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाद्वारे विज्ञान शिकवावे, या प्रचलित भूमिकेपेक्षा नव्या ज्ञानरचनावादानुसार विद्यार्थ्यांनी त्यातील कृती स्वत: कराव्या व त्यांच्या निरीक्षणातून विज्ञान समजून घेण्याचा प्रयत्न स्वतः विद्यार्थ्याने करावा व आम्ही शिक्षकांनी फक्त एका समंजस, प्रगल्भ मार्गदर्शकाची भूमिका स्वीकारावी. शासनाच्या धोरणानुसार मी हा पाठ घेण्याचे ठरविले व म्हणूनच निश्चित केलेली उद्दिष्टे देखील साध्य करण्यामध्ये मी यशस्वी ठरले.

पाच गटांमध्ये केलेल्या वर्गीकरणानुसार मी माझ्या घराच्या सभोवताली असणाऱ्या वनस्पती गोळा करून झूमच्या माध्यमातून दाखविल्या. त्याचे वर्णन करून सांगितले. शास्त्रीय नावे असलेल्या वनस्पतींच्या व्यावहारिक नावांची ओळख करून देऊन मुलांना गावी राहत असलेल्या ठिकाणी त्या वनस्पती शोधून त्यांचे निरीक्षण करण्यास सांगितले.


विद्यार्थ्यांमध्ये उत्साह संचारला व त्यांनी खरोखरच अशा वनस्पती शोधून काढल्या व ऑनलाईन तासिकेच्या दरम्यान मला प्रत्यक्ष दाखविल्या. काहींनी फोटो काढून पाठविले. मी सांगितलेल्या वनस्पतींच्या गुणवैशिष्ट्यांच्या मार्गदर्शनानुसार विद्यार्थी त्या वनस्पतींचे निरीक्षण करू लागले.

रिक्सिया (Riccia) सारख्या वनस्पतीचे मूलाभ (मूळ) मी जसे दाखवीत होते, त्याप्रमाणे मुलेही आपल्या हातातील Riccia चे निरीक्षण करीत होती. तेव्हा स्वतः घेतलेल्या अनुभूतीचा व स्वतः केलेल्या कृतीचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता.

- **परिणामकारकता :**

सूक्ष्म निरीक्षणाद्वारे वनस्पती स्वतःच शोधून काढलेल्या असल्याने विद्यार्थी खूप उत्साहाने त्या वनस्पतींचे अचूक वर्गीकरण करू शकले.

- विद्यार्थी त्या वनस्पतींचे वैज्ञानिक दृष्टिकोनातून निरीक्षण करण्यास शिकले.
- विद्यार्थ्यांप्रमाणे मी सुद्धा प्रेरित होऊन आणखी बऱ्याच वनस्पतींचे या पाठाच्या अनुषंगाने निरीक्षण करू लागले. अर्थात मी शिक्षिका असूनही विद्यार्थ्याची भूमिका स्वीकारल्यामुळे, मुलांमध्ये देखील त्यामुळे आणखी उत्साह निर्माण झाला.
- वनस्पतींचे वर्गीकरण करण्याकरिता आवश्यक अशी जिज्ञासा वृत्ती व कुतूहल विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाले. इतकेच नव्हे तर, अशा सर्वसामान्यांना अनभिज्ञ असणाऱ्या या वनस्पतींचे काळाच्या



ओघात नष्ट होण्यापासून रक्षण करणे व संवर्धन करणे आवश्यक आहे, याची विद्यार्थ्यांना जाणीव झाली.

- प्रत्येक सजीव निसर्गामध्ये टिकाव धरून राहण्या–साठी परिस्थितीशी जुळवून घेऊन स्वतःमध्ये बदल घडवून आणतो, अनुकूलन साधतो. जसे, निवडुंगासारखी शुष्क वनस्पती वाळवंटी प्रदेशात आणि सूचीपर्णी वृक्ष, पाईन, देवदार यांसारखे वृक्ष बर्फाळ प्रदेशात अनुकूलनामुळेच टिकू शकतात, पण उत्क्रांतीच्या सिद्धांतानुसार अनुकूलन न साधणारे काळाच्या ओघात नष्ट होतात, हे सुद्धा मुले त्या निरीक्षणातून शिकली.

**निष्कर्ष :**

Survival of the fittest. (सक्षम सजीवच जगण्यास लायक असतो.) या डार्विनच्या सिद्धांतानुसार आपणही बदलत्या काळानुसार, परिस्थितीनुसार स्वतःमध्ये बदल घडविला पाहिजे, सध्याच्या तीव्र स्पर्धेच्या युगात आवश्यक असणारे हे जीवनमूल्य नकळत विद्यार्थ्यांच्या मनामध्ये या पाठाच्या अध्यापन पद्धतीच्या निमित्ताने रुजले. विद्यार्थ्यांना स्वतः निरीक्षण करून, वनस्पतींमधील साम्य शोधून काढून, त्यांचे अचूकपणे थॅलोफायटा (शैवाल, बुरशी) ब्रायोफायटा (शेवाळी, रिक्सिया), टेरिडोफायटा (नेचे, बीजी वनस्पती), एकबीजपत्री, द्विबीजपत्री अशा विविध गटांमध्ये त्यांचे वर्गीकरण करता आले. या कृतीतून, अनुभूतीतून त्यांना आनंद मिळाला आणि विज्ञानाविषयी रुची निर्माण झाली. विद्यार्थ्यांना नकळतपणे परिस्थितीशी समायोजन करण्याच्या आदर्श जीवनमूल्याची अनुभूती यातून मिळाली, हेच या उपक्रमाचे सार्थक म्हणणे उचित ठरेल.

■■■

## सांगा सांगा बाई सांगाना, कोरोना जाईल का ?

**विद्याधर शुक्ल**
भ्रमणध्वनी : ८१४९००२९५८



सांगा सांगा बाई सांगाना,
कोरोना जाईल का ?
कोरोनाची सुट्टी संपून,
शाळा उघडेल का ?
सांगानाऽऽऽ सांगा सांगा, बाई सांगाना...

बाई आता घरी बसून आला कंटाळा
मित्रांची आठवण येते कितीतरी वेळा
सांगानाऽऽऽ सांगा सांगा बाई सांगाना....

दप्तर घेऊन पाठीवर गप्पा मारत
येता येईल पुन्हा कधी आपल्या शाळेत ?
सांगानाऽऽऽ सांगा सांगा बाई सांगाना...

रुमालपाणी, शिवणापाणी सुट्टीत छोट्या
खेळायला मिळतील कधी टिपरी नि गोट्या ?
सांगानाऽऽऽ सांगा सांगा बाई सांगाना...

राणी, बंडू सारे मिळून मधल्या सुट्टीत
कधी खायला मिळेल आता डबा शाळेत ?
सांगानाऽऽऽ सांगा सांगा बाई सांगाना...

टेनिस बॉल वाढदिवशी आईने आणला
अप्पा रप्पी कधी शाळेत मिळेल खेळायला ?
सांगानाऽऽऽ सांगा सांगा बाई सांगाना...

पुस्तकातली पिसे आणि चांदी चॉकलेटची
मैत्रिणींना सांगा आम्ही कधी दाखवायची ?
सांगानाऽऽऽ सांगा सांगा बाई सांगाना...

करणार अभ्यास रोज, शाळेत दंगा नाही करणार
सांगा एकदा शाळा आमची कधी उघडणार ?
सांगानाऽऽऽ सांगा सांगा बाई सांगाना...

ऑनलाईन संपून कधी वर्ग होणार सुरू ?
सांगाल ते ऐकू, सारे मनापासून करू
सांगानाऽऽऽ सांगा सांगा बाई सांगाना...

■■■



१७ सप्टेंबर : प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे जन्मदिन (१८८५)

# लॉकडाऊनमध्ये ऑनलाईन उपक्रम

**नंदिनी धाक्रस**
अध्यक्ष, मुंबई मराठी अध्यापक संघ
भ्रमणध्वनी : ९८२०५२४८३६

**आंतरजाल उपक्रमातून सलग ३३ दिवस शिक्षक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन :**

कोरोनाच्या महामारीने सगळे जग थांबले. उद्योगधंदे बंद झाले, तर अनेक कंपन्यांमधील कर्मचारी 'वर्क फ्रॉम होम' करू लागले. माणसाच्या आयुष्याला दिशा देणारे शिक्षण कसे सुरू ठेवावे याबाबत चिंता होतीच. ऑनलाईन शिक्षणात शिकण्याची आशा पल्लवीत झाली. एकूणच ऑनलाईन शिक्षणाचा पर्याय स्वीकारण्याकडे कल दिसून येऊ लागला. प्रत्यक्ष शाळा केव्हा सुरू होतील याचा अंदाज बांधता येत नसल्याने ऑनलाईनच्या वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवरून आज राज्यात शिक्षण दिले जात आहे. त्यासाठी विविध ॲप्स, गुगल मीट, जिओ, झूम यांसारख्या ॲपच्या माध्यमातून अनेक शिक्षक विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहेत. हे शिक्षण अधिक प्रभावी व्हावे किंबहुना इयत्ता दहावीच्या महत्त्वाच्या वर्षात दर्जेदार शिक्षण मिळावे, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष व्यवस्थित पूर्ण करता यावे, पाठ्यक्रमातील सर्व पाठांचे अध्ययन-अध्यापन सुरळीत पार पडावे, विद्यार्थ्यांमधील अपेक्षित क्षमता, सुप्त कौशल्ये यांना वाव देता यावा, याचबरोबर आशयाचे आकलन होऊन त्याचे उपयोजनही विद्यार्थ्यांना करता यावे यासाठी महाराष्ट्र मराठी माध्यमिक शिक्षक संघ, मुंबई विभागाने पुढाकार घेऊन आंतरजाल उपक्रमाची सुरुवात केली व त्यासाठी इयत्ता दहावी, मराठी (कुमारभारती) विषय एका महिन्यात प्रत्यक्ष लेखक, कवी, मराठी भाषा अभ्यास गट सदस्यांच्या प्रत्यक्ष भेटीतून शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी शिकविला गेला.

> *लॉकडाऊनमुळे शाळा बंद आहेत. दहावीचे विद्यार्थी चिंतेत आहेत. या महत्त्वाच्या वर्षात दर्जेदार शिक्षण मिळावे, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष व्यवस्थित पूर्ण करता यावे, पाठ्यक्रमातील सर्व पाठांचे अध्ययन-अध्यापन सुरळीत पार पडावे, विद्यार्थ्यांमधील अपेक्षित क्षमता, सुप्त कौशल्ये यांना वाव देता यावा, याचबरोबर आशयाचे आकलन होऊन त्याचे उपयोजनही विद्यार्थ्यांना करता यावे यासाठी महाराष्ट्र मराठी माध्यमिक शिक्षक संघ, मुंबई विभागाने पुढाकार घेऊन आंतरजाल उपक्रमाची सुरुवात केली त्याविषयी....*

दि. ११ जुलै ते १३ ऑगस्ट २०२० या सलग ३३ दिवस चाललेल्या या उपक्रमाचा समारोप राज्याचे शिक्षण संचालक, दिनकर पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

या आंतरजाल उपक्रमात, पाठ्यपुस्तकात ज्या लेखकांचे व कवींचे पाठ आणि कविता आहेत, ते लेखक महेंद्र कदम, सुप्रिया खोत, अरविंद जगताप, वीरा राठोड, यांच्या समवेत कवयित्री डॉक्टर नीलिमा गुंडी, नीरजा, ज. वि. पवार, डॉक्टर यशवंत पाठक आदी मान्यवरांनी प्रत्यक्ष पाठ, कवितांबद्दल शिक्षक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मार्गदर्शन, प्रतिक्रिया व प्रश्नोत्तरे असे स्वरूप असलेल्या या आंतरजाल उपक्रमात विद्यार्थ्यांनी कोणती भाषिक

कौशल्ये आत्मसात करायची आहेत, विद्यार्थ्यांची आकलनशक्ती, विचारशक्ती, कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलता विकसित करण्याच्या दृष्टीने कोणते प्रयत्न करायला हवेत याचा ऊहापोह देखील करण्यात आला. या उपक्रमात शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवर अधिकारी, एस.एस.सी बोर्ड अधिकारी, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या अधिकाऱ्यांनीही ऑनलाईन वर्गामध्ये उपस्थित राहून शिक्षक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दररोज दुपारी तीन ते पावणे पाच या पावणे दोन तासांच्या व सलग तीस दिवस चाललेल्या उपक्रमामध्ये मुंबईसह राज्यातील शेकडो शिक्षकांनी सहभाग घेतला.

**असे झाले शिक्षक–विद्यार्थी सहभागी :**

'इयत्ता दहावी मराठी कुमारभारती' या उपक्रमात मुंबईसह राज्यातील शिक्षकांच्या सुमारे दोनशेहून अधिक व्हॉट्सॲप ग्रुपवर रोज कार्यक्रमाची लिंक पाठविली जात होती. दोन लिंक दिल्या जात होत्या. यामध्ये पहिल्या लिंक मधून १०० शिक्षक तर दुसऱ्या यू–ट्यूबच्या लिंकवर मर्यादा नसल्याने रोज शेकडो विद्यार्थी व शिक्षक या उपक्रमात सहभागी होत होते. जे काही कारणास्तव सहभागी होऊ शकत नव्हते अशा शिक्षकांसाठी, झालेल्या मार्गदर्शनाची लिंक शिक्षकांच्या ग्रुपवर पाठविली जात होती. त्यामुळे अनेक व विद्यार्थी–शिक्षक या उपक्रमाचा लाभ घेऊ शकले.

**लेखक–कवी व मराठी भाषा अभ्यासगट सदस्यांचा सहभाग :**

इयत्ता दहावी मराठी कुमारभारती पुस्तकातील चार भागांमध्ये विभागलेले २० पाठ, कविता व स्थूलवाचन तसेच भाषाभ्यास, उपयोजित लेखन व दहावीच्या नवीन कृतिपत्रिकेचा आराखडा यांवर प्रत्यक्ष लेखक, कवी व अभ्यासमंडळ सदस्यांकडून शिक्षक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच मराठी कुमारभारती हे विद्यार्थ्यांच्या आवडीचे भाषेचे पुस्तक कसे होईल, या दृष्टीने सर्व पाठ, कविता अभ्यासक्रमात घेण्याबाबत पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाचा हेतू देखील लेखक, कवींनी स्पष्ट केला. पाठातील व कवितेतील मूल्य व संदेश सांगितला. शिक्षकांनी स्वतःच्या सर्जनशीलतेने, कल्पकतेने प्रत्यक्ष वर्ग अध्यापन करताना पाठाचे मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजवावे असा संदेश मान्यवर लेखक कवींनी दिला.

यातील काही निवडक कवी व लेखकांनी पाठ व कवितांच्या अनुषंगाने केलेले मार्गदर्शन व दिलेल्या सूचना पुढीलप्रमाणे :

**पाठ – वसंतहृदय चैत्र (लेखिका दुर्गा भागवत) :**

या पाठाबाबत मार्गदर्शक वैशाली अघोर यांनी केलेले मार्गदर्शन : विद्यार्थ्यांचा भावनिक, सामाजिक, सांस्कृतिक विकास करणे, यासाठी शाळांमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करणे, मानवी जीवन सुखी, समृद्ध, सुंदर असल्याची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करून भूतदया, संवेदना, निसर्गप्रेम अशा विविध मूल्यांची रुजवणूक करून वृक्षसंगोपनाचे संस्कार विद्यार्थ्यांवर करणे.

**कविता – आश्वासक चित्र (कवयित्री नीरजा) :**

यांनी वर्ग, वर्ण, वंश, लिंग, जाती या सर्व भेदांच्या आधारावर असलेली विषमता नष्ट व्हावी तसेच स्त्रीकडे माणूस म्हणून पहायला हवे, यासाठी शाळेतून जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवे असे प्रतिपादन करून विविध नाटुकली, प्रसंगनाट्य असे उपक्रम घेऊन स्त्री–पुरुष समानता रुजविण्याबाबत सांगितले.

**पाठ – 'आप्पांचे पत्र' :**

या पाठाचे लेखक अरविंद जगताप यांनी विद्यार्थ्यांनी निसर्गाशी मैत्री करावी यासाठी, शिक्षकांनी

गाव परिसरातील रानावनात क्षेत्रभेटी आयोजित कराव्यात असे सांगून श्रमप्रतिष्ठा, आदर, प्रेम, जिद्द ही मूल्ये पाठातून शिकवावीत असे आवाहन केले.

**कविता - मनक्या पेरेन लागा :**

ही कविता शिकविताना कवी वीरा राठोड यांनी बोलीभाषेच्या संवर्धनासाठी शाळेतून प्रयत्न करायला हवेत. विद्यार्थ्यांना बोलीभाषेतून व्यक्त होऊ देऊन मग प्रमाणभाषेकडे न्यावे. बोलीभाषेतून एखादा अनुवाद, निबंध, काव्यलेखन स्पर्धा आयोजित कराव्यात अशा सूचना केल्या.

**पाठ - गोष्ट अरुणीमाची (लेखिका सुप्रिया खोत) :**

पाय गमावूनही माऊंट एव्हरेस्ट सर करणाऱ्या अरुणीमाची कहाणी कथन करून मनाचे सामर्थ्य, स्वयंशिक्षण, जिद्द, चिकाटी, धैर्य, महत्त्वाकांक्षा, प्रयत्नवाद शालेय स्तरापासून विद्यार्थ्यांमध्ये कसा रुजवावा याबाबत मार्गदर्शन केले.

**शिक्षक-विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधान :**

प्रत्येक सत्रात मान्यवर लेखक व कवींचे मार्गदर्शन झाल्यानंतर अर्धा तास प्रश्नोत्तरासाठी राखीव ठेवण्यात येत होता. यामध्ये शिक्षक व विद्यार्थ्यांच्या पाठासंदर्भातील, कवितांमधील अथवा व्याकरणामधील प्रत्येक प्रश्नाला मान्यवरांकडून उत्तरे दिली जात होती. त्यामुळे प्रत्येक सत्र एकतर्फी न होता प्रत्येकाशी संवाद साधला जात होता.

**प्रत्येक सत्राचे डिजिटलायझेशन :**

प्रत्येक सत्र हे झूम ॲप सोबत यू-ट्यूब वर लाईव्ह दाखविले जात होते. त्यामुळे शेकडो शिक्षक या सत्राला उपस्थित राहत होते. जे उपस्थित राहू शकले नाहीत त्यांच्यासाठी या आंतरजाल उपक्रमाचे डिजिटलायझेशन करण्यात आले असून विद्यार्थी व शिक्षकांना याचा लाभ कायमस्वरूपी मिळणार आहे.

**शिक्षण अधिकाऱ्यांच्या आंतरजालला भेटी :**

समारोपाचे सत्र राज्याचे शिक्षण संचालक, दिनकर पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. या उपक्रमाचे कौतुक करताना त्यांनी या उपक्रमातून विद्यार्थ्यांचे भाषिक कौशल्य विकसित होणार असल्याचे सांगितले तसेच या आंतरजाल उपक्रमाला महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय सचिव - संदीप संगवे, बृहन्मुंबई, उत्तर विभाग शिक्षण निरीक्षक - डॉ. मुश्ताक शेख, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे सहायक आयुक्त, सुरेश माळी, ठाणे जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी, शेषराव बडे, प्रादेशिक विद्या प्राधिकरणातील विषयतज्ज्ञ - निंबाजी गीते आदी मान्यवरांनी भेट देऊन उपक्रमाचे कौतुक केले.

■■■


## वर्गणीदारांसाठी सूचना

'जीवन शिक्षण' मासिकाची वार्षिक वर्गणी रु. ३००/- (रुपये तीनशे फक्त) आहे. आपली वर्गणी **'संपादक, जीवन शिक्षण, पुणे ३०'** या नावे **'स्टेट बँक ऑफ इंडिया'**च्या कोणत्याही शाखेत बचत खाते क्र. **11153675105** मध्ये भरावी. बँकेत पैसे भरल्याच्या पावतीची झेरॉक्स प्रत, स्वत:चा पूर्ण पत्ता, (पिनकोड द्यावा.) मोबाईल नंबर व ई-मेल आयडीसह पोस्टाने अथवा ई-मेलने jeevanshikshan@maa.ac.in वर पाठवावी. 'जीवन शिक्षण'ची वार्षिक वर्गणी अथवा पुस्तके मागणीसाठीचे पैसे मनीऑर्डरनेही स्वीकारले जातील.

# केल्याने होत आहे रे...!

**वैभव जगताप**
जिजामाता कन्या विद्यालय, नेर परसोपंत, जि. यवतमाळ
भ्रमणध्वनी : ९४२३४३३८३२

मित्रांनो शिक्षण ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. कोणत्याही परिस्थितीत ती बंद होऊ शकत नाही. कारण प्रत्येक माणूस जीवन जगत असताना आवश्यक असलेली प्रत्येक गोष्ट शिकण्याचा प्रयत्न करीतच असतो. आपण सुद्धा बघत आहोत की, कोरोनाच्या माहामारीमुळे शाळा बंद आहेत, त्यामुळे विद्यार्थ्यांचे शाळेत जाऊन शिक्षण घेणे बंद आहे परंतु त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात ज्या नवीन समस्या निर्माण होत आहेत, त्या समस्या सोडविण्यासाठी त्यांची धडपड निश्चितच चालू आहे. अर्थात अनौपचारिक रीतीने त्यांचे जीवन शिक्षण सुरू आहे. त्यामुळे मुलांचे शिक्षण बंद आहे असे आपण म्हणू शकणार नाही. त्याचबरोबर शिक्षक सुद्धा आपल्या विद्यार्थ्यांचे शालेय शिक्षण सुरू रहावे याकरिता प्रचंड धडपड करीत आहेत. प्रत्येकाचे मार्ग वेगवेगळे आहेत परंतु उद्देश मात्र विद्यार्थ्यांपर्यंत शालेय शिक्षण पोहोचविणे हाच आहे.

> *शाळेत जाऊन शिकणे बंद असले तरी अनौपचारिक रीतीने जीवन शिक्षण सुरू आहेच. शिक्षक सुद्धा आपल्या विद्यार्थ्यांचे शालेय शिक्षण सुरू रहावे याकरिता प्रचंड धडपड करीत आहेत. प्रत्येकाचे मार्ग वेगवेगळे आहेत, परंतु उद्देश मात्र विद्यार्थ्यांपर्यंत शालेय शिक्षण पोहोचविणे हाच आहे.*
>
> *नेर परसोपंत शाळेने आपल्या विद्यालयाच्या नावाचे स्वतंत्र शैक्षणिक ॲप तयार करून घेतले आणि तंत्रस्नेही शिक्षकांच्या मदतीने त्याच्या वापरासंबंधी प्रशिक्षण घेऊन त्यांचा ऑनलाईन शिक्षणाचा प्रवास सुरू झाला. त्याविषयी...*

हाच उद्देश डोळ्यांसमोर ठेवून आमच्या दि एनलायटेन युथ एज्युकेशन सोसायटी नेर द्वारा संचालित जिजामाता कन्या विद्यालय नेर परसोपंत, जिल्हा यवतमाळ विद्यालयाने विद्यार्थ्यांपर्यंत शालेय शिक्षण पोहोचविण्याकरिता सुरुवातीला व्हॉट्सॲपच्या माध्यमातून, झूम मीटिंग, गुगल मीट यांसारख्या ॲपचा वापर करून शिक्षण पोहोचविण्याचा प्रयत्न केला. त्याला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद सुद्धा मिळाला परंतु त्यातील काही तांत्रिक अडचणी तसेच वेळेची समस्या यांमुळे बऱ्याच विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे शक्य होते नव्हते.

आम्ही जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचू शकू, तांत्रिक अडचण कमी होईल, विद्यार्थ्यांना त्यांच्या सोयीनुसार, वेळेनुसार अभ्यास करणे शक्य होईल अशा एका गोष्टीच्या शोधात आम्ही सर्वजण होतो. त्यातूनच आम्ही आमच्या विद्यालयासाठी एक अभिनव प्रयोग करण्याचे ठरविले, जो आम्हांला विद्यार्थ्यांपर्यंत शालेय शिक्षण पोहोचविण्यासाठी मदत करेल.

आम्ही आमच्या विद्यालयाच्या नावाचे स्वतंत्र शैक्षणिक ॲप तयार करण्याच्या उद्देशाने वेगवेगळ्या सॉफ्टवेअर कंपन्यांशी संपर्क साधला आणि

scroll and solve या कंपनीशी वार्षिक करार करून एक स्वतंत्र शैक्षणिक ॲप आमच्या जिजामाता कन्या विद्यालयाच्या नावाने तयार करून विकत घेतले आणि मग खरा संघर्ष सुरू झाला. कारण हे सॉफ्टवेअर म्हणजे केवळ एक ढाचा होता. याला योग्य रीतीने वापरण्याकरिता सर्व विद्यार्थ्यांची माहिती तसेच सर्व शैक्षणिक साहित्य तयार करून आम्हांला यावर अपलोड करायचे होते आणि हे तांत्रिक कार्य करण्यासाठी निश्चितच तंत्रस्नेही शिक्षक खूप आवश्यक होते. आमच्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका दीपा फाटे यांच्या नेतृत्वाखाली सर्व शिक्षकांनी हे काम अतिशय समर्थपणे हाताळले व सुरू झाला एका नवीन शैक्षणिक ॲपचा प्रवास.

ॲपचा वापर करण्याकरिता प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतंत्र आय.डी. व पासवर्ड देण्यात आलेले आहेत, ज्याद्वारे ते आपल्या शिक्षकांनी पुरविलेली शैक्षणिक माहिती जी व्हिडिओ स्वरूपात, पीडीएफ स्वरूपात आहे, ती अगदी सहज पाहू शकतात व समजून घेऊ शकतात. त्याला वेळेचे सुद्धा बंधन नाही. ते आपल्या सोयीने अभ्यास करू शकतात. सोबतच आम्ही प्रत्येक वर्गाचे स्वतंत्र वेळापत्रक सुद्धा तयार केले आहे. त्यात दर दिवशी तीन तासिका असतील अशा प्रकारे सर्व विषयांचा समावेश असलेले वेळापत्रक तयार केले. त्यामुळे विद्यार्थ्यांना दररोजच्या ठरावीक तासिकांचा अभ्यास करणे शक्य झाले, तसेच शिक्षकांना सुद्धा त्यानुसार अभ्यासक्रम अपलोड करणे सोयीचे गेले. प्रत्येक विषयाची आठवड्यातून दोन वेळा मूल्यमापन चाचणी सुद्धा घेतली जाते. सोबतच ज्या विद्यार्थ्यांकडे अँड्रॉईड फोन नाहीत अशा विद्यार्थ्यांकरिता सुद्धा विशेष सुविधा केलेली आहे. त्यांच्या मित्र–मैत्रिणींमार्फत त्यांचे गट पाडून त्यांच्यापर्यंत सुद्धा ही सुविधा पुरविण्याचा प्रयत्न शाळेने केलेला आहे. या ॲपमध्ये शैक्षणिक साहित्य पोहोचविण्याची सुविधा तर आहेच, शिवाय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मूल्यमापन करण्याची सुविधा सुद्धा उपलब्ध आहे, ज्या द्वारे शिक्षकांना त्यांनी उपलब्ध केलेल्या शैक्षणिक साहित्यावरून विद्यार्थ्यांना किती प्रमाणात समजले किंवा समजलेच नाही याचा अंदाज येऊ शकतो.

या नावीन्यपूर्ण संकल्पनेमुळे विद्यार्थी कोणत्याही अडथळ्याशिवाय आपल्या घरी तात्पुरत्या स्वरूपात का होईना अभ्यासात खंड पडू न देता अभ्यास करू शकत आहेत. त्याकरिता शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या घरापर्यंत पुस्तके पोहोचविली, ज्याचा उपयोग करून विद्यार्थी आपल्या अभ्यासात सातत्य ठेवीत आहेत. या शैक्षणिक ॲपकरिता आम्ही शाळेतील शिक्षकांनी व सर्व तंत्रस्नेही शिक्षकांनी खूप मेहनत घेतली आणि हे कार्य सफल करून दाखविले. या सर्व नावीन्यपूर्ण संकल्पना विद्यालयांमध्ये राबविण्याकरिता आमचे गटशिक्षणाधिकारी तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यवतमाळ येथील ज्येष्ठ अधिव्याख्याता यांचे वेळोवेळी आम्हांला मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाले. त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

■■■

# जीवनाकरिता व सातत्यपूर्ण विकासासाठी साक्षरता

**डॉ. सीमा पुसदकर**
अधिव्याख्याता, राज्य विज्ञान संस्था, नागपूर.

भारत हा एक ऐतिहासिक आणि सृमद्धशाली परंपरा लाभलेला देश आहे. सर्वसंपन्न आणि विविधतेने नटलेला, सांस्कृतिक वारसा असलेला, समाजाचे कल्याण आणि लोकशाही मूल्यांची बांधिलकी मानणारा व जपणारा स्वतंत्र देश आहे. प्रत्येक देशाचा कारभार त्या त्या देशाच्या लिखित राज्यसंहितेनुसार किंवा संविधानानुसार चालविला जातो. देशाच्या शासनाची संरचना संविधानाने अथवा संहितेने ठरवून दिलेली असते. आपल्या देशाच्या घटनेला एक प्रस्तावना जोडलेली आहे. त्या प्रस्तावनेला सरनामा असे म्हटले जाते. या सरनाम्यात भारतीय समाजाची उभारणी, स्वातंत्र्योत्तर समाजाच्या पुनर्निर्मितीचे आश्वासन, भारतीयांच्या जीवनाची वैशिष्ट्ये, लोकशाही धोरणमूल्ये, कौशल्ये यांचा स्वीकार केला आहे.

या सरनाम्यात सांगितलेल्या आशयाचा अर्थ समजून घेण्यासाठी सुजाण व सुशिक्षित नागरिक निर्माण होण्याची गरज आहे. सुजाण नागरिक निर्माण करण्याचे काम त्या त्या देशाच्या शिक्षण व्यवस्थेत असते. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांच्या बरोबरीने शिक्षण सुद्धा मूलभूत गरज आहे. शिक्षण घेण्याचा हक्क प्रत्येकाला आहे. शिक्षणाच्या मूलभूत हक्कानुसार (RTE) सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याचे निर्धारित केले आहे.

> *शिक्षण ही प्रत्येकाची जीवनावश्यक मूलभूत गरज आहे आणि म्हणूनच जगातील प्रत्येक जबाबदार व्यक्ती साक्षरता प्रसारासाठी कटिबद्ध आहे. आंतरराष्ट्रीय सहकार्यातून शिक्षण, विज्ञान आणि सांस्कृतिक विकास व त्यातून शांतता व सुव्यवस्थेला उत्तेजन देण्यासाठी युनेस्कोने साक्षरतेचे महत्त्व लक्षात घेऊन नोव्हेंबर १९६५ मध्ये आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस साजरा करण्यास मान्यता दिली. ८ सप्टेंबर हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.*

शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाची सुरुवात अगदी शाहू महाराजांच्या काळापासून झाली. स्वातंत्र्यानंतरच्या काळात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९६८), राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६) व त्यानंतर सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षण अभियान यांमधून सार्वत्रिकीकरणाचे प्रयत्न करण्यात आले आहेत, पण अजूनही शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे ध्येय आपण गाठू शकलो नाही. साक्षरतेचा अभाव ही फक्त आपल्या देशाची समस्या नाही, तर ही समस्या जागतिक स्तरावरची आहे.

### शिक्षण व साक्षरता :

शिक्षण ही प्रत्येकाची जीवनावश्यक मूलभूत गरज आहे आणि म्हणूनच जगातील प्रत्येक जबाबदार व्यक्ती साक्षरता प्रसारासाठी कटिबद्ध आहे. आंतरराष्ट्रीय सहकार्यातून शिक्षण, विज्ञान आणि सांस्कृतिक विकास व त्यातून शांतता व

सुव्यवस्थेला उत्तेजन देण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या युनेस्कोने (UNESCO) शिक्षणाचे, साक्षरतेचे महत्त्व लक्षात घेऊन नोव्हेंबर १९६५ मध्ये आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस साजरा करण्यास मान्यता दिली व त्या पुढील वर्षापासून ८ सप्टेंबर हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. व्यक्ती समाज आणि समुदायासाठी साक्षरता खूप महत्त्वपूर्ण बाब आहे, हे पटवून देण्यासाठी संपूर्ण जगभरात हा दिवस साजरा केला जातो. या निमित्ताने सर्व शाळांमध्ये, शैक्षणिक संस्थांमध्ये, महाविद्यालये व शासकीय कार्यालयांमधून आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनासंदर्भात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. रॅली, घोषणा, पथनाट्य, भाषणे, इत्यादींमधून शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले जाते व प्रत्येकाने शिक्षण घेतले पाहिजे, साक्षर असले पाहिजे याची जाणीव करून दिली जाते. शिक्षणाचा प्रसार व प्रचार या निमित्ताने केला जातो. ज्या देशात शिक्षण नाही, साक्षरतेचे प्रमाण कमी आहे तो देश प्रगती करू शकत नाही. साक्षरता हे विकासाचे किंवा देशाच्या प्रगतीचे एक महत्त्वाचे परिमाण (Parameter) आहे. साक्षरतेच्या प्रमाणावरून त्या भागाचे किंवा भौगोलिक क्षेत्राच्या उन्नतीचे आकलन करता येते. शिक्षणाने जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन व विवेक विकसित होतो तर साक्षरतेने जीवनातील कौशल्ये आणि क्षमता विकसित करता येतात.

### साक्षरतेच्या व्याख्या व व्याप्ती :

युनेस्को या आंतरराष्ट्रीय संस्थेने साक्षरतेची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, 'शोध घेण्याची क्षमता, समज, अर्थनिर्वचन (Interpretation), संवाद, संगणकीय (Computing) आणि विविध पैलूंतून लिखित बाबींची छाप करण्यापर्यंत कौशल्य विकसित करणे म्हणजे साक्षरता होय.' व्यक्तिगत पातळीवर निर्धारित उद्देश गाठण्याकरिता आणि ज्ञान विकसित करण्याकरिता, क्षमता विकसित करणे आणि सहभागिता करणे होय, ज्याचा उपयोग समुदाय आणि व्यापक समाजाकरिता होतो.

भारत सरकारचे राष्ट्रीय साक्षरता मिशन (National Literacy Mission) असे म्हणते की, 'लिहिणे, वाचणे आणि त्याचा अर्थ समजणे या क्षमतेसह अंकज्ञानाचा उपयोग व्यक्तीला दैनंदिन जीवनात करता येणे' म्हणजे साक्षरता होय. या क्षमतेच्या आणि कौशल्यांच्या आधारे एकविसाव्या शतकातील अनेक नवीन आव्हानांना तोंड देण्यासाठी सक्षम नागरिकांची गरज आहे आणि असे नागरिक केवळ शिक्षणाने तयार होऊ शकतात. साक्षरता म्हणजे त्या व्यक्तीला फक्त लिहिता, वाचता येणे एवढ्यापुरता त्याचा मर्यादित अर्थ नाही, तर साक्षर असणे म्हणजे खऱ्या अर्थाने सुशिक्षित असणे होय. त्याला लिहिता वाचता आले पाहिजे ही पहिली पायरी आहे, पण त्यापुढे जाऊन जे वाचले, जे लिहिले त्याचा अर्थ समजला पाहिजे, त्या ज्ञानाला आपल्या जीवनाशी जोडून जगता आले पाहिजे. लोकशाही म्हणजे काय, सुजाण नागरिक म्हणजे काय, हे त्याला समजले पाहिजे. स्वतः तसे होण्याचा प्रयत्न त्याने करावा, विचार करावा आणि हे समजून घेऊन आचार करावा. घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीमागचे कारण शोधण्याची वृत्ती त्याच्या अंगी असावी. स्वतःच्या समस्या सोडविण्याची क्षमता त्याच्या अंगी असावी. स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता याचा अर्थ समजून घेऊन त्याप्रमाणे त्याने वागावे. अंधश्रद्धा, गैरसमजुतींना थारा देऊ नये. निसर्गजतन, प्राणीजतन, वृक्षप्रेम यांसारख्या भावना त्याच्यामध्ये असाव्यात. त्याला संवाद साधता यावा. समुदायाची संकल्पना समजून घेऊन समुदायात आपली भूमिका कोणती हे समजून घेण्याची कुवत त्याच्यात असावी. स्वतःची कामे स्वतः करणारा, दुसऱ्यांच्या हक्कांप्रती जागरूक असणारा, सेवाभावी प्रवृत्ती अंगी बाळगणारा, या बरोबरच जीवन जगण्यास आवश्यक सर्व कौशल्ये व मूल्यांची त्याला

कमी–अधिक प्रमाणात समज असणे म्हणजे तो खऱ्या अर्थाने साक्षर किंवा सुशिक्षित असे म्हणता येईल. गांधीजींनी त्यांच्या १८ रचनात्मक कार्यक्रमावलीत 'नई तालीम आणि प्रौढ शिक्षण' याला महत्त्वाचे स्थान दिले होते. व्यक्ती अशा पद्धतीने शिक्षण घेऊन साक्षर झाली, तर कुटुंब, समाज आणि समुदायाची जडण–घडण देखील अशा प्रकारे होईल व त्यानंतर देशात व पर्यायाने जगामध्ये शांतता व सुव्यवस्था निर्माण होण्यास वेळ लागणार नाही.

### आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस :

साक्षरता दिन सुरू करण्यामागचा मूळ उद्देश निरक्षरता संपवून सुजाण नागरिक निर्माण करणे आहे. जेव्हा हे अभियान १९६५–६६ मध्ये सुरू करण्यात आले, त्यावेळी १९९० पर्यंत कोणत्याही देशात, कोणीही निरक्षर राहणार नाही असे निर्धारित करण्यात आले. १०० टक्के लोक साक्षर होतील असा संकल्प करण्यात आला. ज्या देशात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. अशा देशांमध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. देशातील लोकांना भयमुक्त लोकशाही तत्त्वांचे पालन करणारे विवेकनिष्ठ जीवन जगायचे असेल तर शिक्षण खूप महत्त्वाचे आहे याची जाणीव सर्वांना झाली होती. शिक्षणावर आधारित विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

### साक्षरता दिवस व विषय निवड :

आपल्या देशात साक्षरतेचा प्रसार आणि प्रचार औपचारिक व अनौपचारिक शिक्षणाच्या माध्यमातून केला जातो. औपचारिक शिक्षणांतर्गत ६ ते १५ वयातील मुले शाळेत जाऊन शिकतात व १५ ते ३५ वयोगटातील प्रौढ शिक्षणाअंतर्गत असलेल्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होतात. आज भारतात प्रत्येक नागरिकापर्यंत शिक्षण पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात आहे परंतु आजही आपल्या देशात काही क्षेत्रे अशी आहेत, जेथे अद्यापही शिक्षण पोहोचले नाही. इतर देशांच्या तुलनेत भारताचा साक्षरता दर कमी आहे. त्यामुळे येथे शिक्षणावर काम करण्याची खूप गरज आहे.

आज आपल्याला पूर्व प्राथमिक व प्राथमिक शिक्षण अधिक सक्षमतेने कसे दिले जाईल याकडे लक्ष पुरविणे खूप गरजेचे आहे. पूर्व प्राथमिक स्तरापासूनच एक सुजाण नागरिक निर्माण झाला पाहिजे, असा विचार करून त्या पद्धतीने शिक्षण दिले तर खऱ्या अर्थाने सुजाण व साक्षर नागरिक भविष्यात पहायला मिळेल.

दरवर्षी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस साजरा करताना साक्षरते संदर्भात एक विषय निर्धारित केला जातो. भविष्यात कोणत्या आव्हानांना सामोरे जावे लागेल, कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागेल, याचा विचार करून समस्येची तीव्रता आणि त्याचे व्यापक स्वरूप लक्षात घेऊन विषयाची निवड जागतिक पातळीवर केली जाते.

### साक्षरता आणि विषय संकल्पना :

एक विषय दिलेला असतो त्यास अधोरेखांकित किंवा लक्ष्य करून काम करायचे असते २००७ आणि २००८ चा विषय होता 'साक्षरता आणि आरोग्य' आपल्या देशात आजाराचे प्रमाण खूप मोठे आहे. बालमृत्यू, कुपोषण, साथीचे रोग, संसर्गजन्य आजार, क्षयरोग, मलेरिया असे अनेक आजार कसे होतात? ते टाळायचे कसे? उपचार पद्धती कोणत्या? या विषयाला लक्षित व केंद्रित करून कार्य करावे लागले. सामाजिक स्वास्थ्य ही देशाची गरज आहे म्हणून या विषयाला प्राधान्य देण्यात आले.

२००९ व २०१० या वर्षाकरिता 'साक्षरता आणि लैंगिक समानता, महिला सक्षमीकरण' या विषयांतर्गत कार्य करण्यात आले व देशभर जगामध्ये महिलांच्या शिक्षणाचा दर वाढविण्यासंदर्भात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले २०११, २०१२ व २०१३ या वर्षांकरिता 'साक्षरता आणि शांतता' या विषयावर



२५ सप्टेंबर : रयत शिक्षण संस्थेची स्थापना (१९१९)

काम करण्यात आले. सगळीकडे पसरलेले वाद-विवाद, आरोप-प्रत्यारोप, जातिभेद, प्रांतभेद यांमुळे देशातील शांतता भंग होऊ नये यासाठी, समाजाकरिता शांततेने व अहिंसेच्या मार्गाने सर्व व्यवहार होणे गरजेचे आहे. त्या विषयाला घेऊन या वर्षात काम करण्यात आले.

२०१४ मध्ये साक्षरता दिवसाचा विषय होता 'एकविसाव्या शतकातील साक्षरता' एकविसाव्या शतकातील आव्हानांना तोंड देण्याची क्षमता विकसित करणे. या अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये तसेच समाज व समुदायामध्ये जागरूकता निर्माण केली गेली.

२०१५ ला 'साक्षरतेने सातत्यपूर्ण विकास' या विषयाची निवड करण्यात आली. साक्षरता ही आजन्म शिकण्याची आणि त्या आधारे स्वतःची व समाजाची कौशल्ये सतत विकसित करण्याची बाब आहे. विविध कौशल्ये व्यक्तीला प्रगतीच्या टप्प्यात घेऊन जातात. त्यामुळे आपल्या जबाबदाऱ्या समजणे, आजूबाजूच्या लोकांना मदत करणे, एखाद्या विषयावर चिंतन करणे याविषयी समज विकसित होते. साक्षरता व सुजाणत्व या गोष्टी एखाद्या व्यक्तीला समस्येतून बाहेर निघण्यासाठी मार्गदर्शक ठरू शकतात.

२०१६ 'अतीत समजणे आणि भविष्य लिहिणे'. २०१७ 'डिजिटल जगात साक्षरता', २०१८ 'साक्षरता आणि कौशल्य विकास' आणि २०१९ 'बहुभाषा आणि साक्षरता' आणि २०२० मध्ये 'कोविड-१९ या समर प्रसंगात साक्षरता शिकणे, शिकविणे आणि पुढील दिशा' हे विषय निवडले. कोविड-१९ चे महामारीचे संकट सर्व जगापुढे आ वासून उभे असताना मुलांच्या शाळा व शिक्षण हा प्रश्न महत्त्वाचा झाला आहे. या काळात मुलांचे शिक्षण चालू राहील या करिता मानसिक बळ देणे आव्हानात्मक आहे. या वातावरणात टिकून राहून शिक्षणाच्या संदर्भात भविष्यकालीन दिशा ठरविणे पण तितकेच महत्त्वाचे आहे.

**साक्षरता दर आणि स्थिती :**

वर्ष २०११ च्या जनगणनेनुसार भारतात २२ टक्के लोक निरक्षर आहेत. केरळ हे भारतातील सर्वांत अधिक साक्षरता दर असलेले राज्य आहे. या राज्यात ९३.९१ टक्के लोक साक्षर आहेत. यानंतर लक्षद्वीप या केंद्रशासित प्रदेशात ९२.२८ टक्के लोक, तर मिझोरममध्ये ८७.४० टक्के लोक साक्षर आहेत. बिहारमध्ये ६३.८२ टक्के व तेलंगणामध्ये ६६.५० टक्के लोक साक्षर आहेत. हे भारतामध्ये सर्वांत कमी साक्षरता दर असलेले राज्य आहे.

**जीवनाकरिता व सातत्यपूर्ण विकासासाठी साक्षरता :**

साक्षरता दिवस साजरा करणे याचा अर्थ एखाद्या कार्यक्रमाचे आयोजन करणे एवढेच अभिप्रेत नाही; तर त्या निमित्ताने सद्य:स्थितीचे आकलन करणे, वैश्विक पातळी ते स्थानिक स्तरापर्यंत होत असलेल्या बदलांचे, स्थितीचे आणि परिस्थितीचे व्यापक आकलन करणे होय. साक्षरता हे असे एक परिमाण आहे, जे जीवन व्यापक किंवा निर्वाह सुकर करण्याचा मार्ग आहे. कार्यप्रवण व कृतिशीलतेकरिता प्रवृत्त होण्याची ती एक महत्त्वाची पायरी आहे. साक्षरता म्हणजे जीवन जगताना येणाऱ्या अडचणी, समस्या आणि प्रश्न यांना योग्य पद्धतीने हाताळण्याची व त्यांच्या निराकरणाची हातोटी होय. साक्षरतेचे अनेक पैलू आहेत, जसे जल साक्षरता, आरोग्य साक्षरता, कृषी साक्षरता. जीवननिर्वाह करण्याकरिता लागणाऱ्या विविध क्षमता आणि कौशल्ये आत्मसात करण्याच्या पद्धती व त्या दैनंदिन जीवनात अंगीकारणे म्हणजे साक्षर होणे होय. म्हणून साक्षरता म्हणजे फक्त अक्षर ओळख नाही, तर त्या त्या विषयाच्या किंवा मुद्द्यांच्या खोलात जाऊन, तो विषय गंभीरपणे आणि सजगतेने समजून घेणे होय. म्हणूनच जीवनाकरिता व सातत्यपूर्ण विकासातील भागीदारी व सहभागितेकरिता साक्षरता हे महत्त्वाचे साधन आहे.

■■■

# माहितीपत्रक

## राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून (RIMC)

## प्रवेश पात्रता परीक्षा दि. १ व २ डिसेंबर २०२० रोजी पात्रता परीक्षा

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी ''राष्ट्रीय भारतीय सैन्य महाविद्यालय, डेहराडून (उत्तरांचल) येथे इयत्ता आठवीसाठी प्रवेश पात्रता परीक्षा'' दिनांक १ व २ डिसेंबर २०२० रोजी पुणे येथे घेण्यात येणार आहे. ही परीक्षा फक्त मुलांसाठीच आहे.

- **प्रवेश वयाची अट :**

१) या परीक्षेसाठी ज्या विद्यार्थ्यांचे वय दि. १ जुलै २०२१ रोजी 11 ½ (अकरा वर्षे सहा महिने) पेक्षा कमी व 13 (तेरा) वर्षांपेक्षा अधिक नाही असे विद्यार्थी सदर परीक्षेस पात्र समजण्यात येतील, म्हणजेच विद्यार्थ्यांचा जन्म दि. २ जुलै २००८ च्या आधी आणि दि. १ जानेवारी २०१० च्या नंतरचा नसावा. (म्हणजेच विद्यार्थ्यांचा जन्म दि. २ जुलै २००८ ते दि. १ जानेवारी २०१० या कालावधीत असावा.)

- **शैक्षणिक पात्रता :**

२) विद्यार्थी दिनांक १ जुलै २०२१ ला कोणत्याही मान्यताप्राप्त शाळेमध्ये इयत्ता सातवी या वर्गात शिकत असावा किंवा सातवी उत्तीर्ण असावा.

परीक्षेसाठी कमांडंट, राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून, उत्तराखंड २४८ ००३ यांचेकडून विहित नमुन्यातीलच आवेदनपत्रे घ्यावयाची आहेत. विद्यार्थ्यांनी अनुसूचित जाती/जमातीसाठी रु. ५५५/– (जातीच्या दाखल्याच्या सत्यप्रतीसह) आणि जनरल संवर्गातील विद्यार्थ्यांनी रु. ६००/– चा डिमांड ड्राफ्ट देणे आवश्यक आहे. सदर डिमांड ड्राफ्ट फक्त स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेचाच असावा. तो 'कमांडंट, आर. आय. एम. सी., डेहराडून, यांचे नावे काढावा. डिमांड ड्राफ्टवर पेएबल ॲट डेहराडून (तेलभवन बँक Code No. ०१५७६) अशी नोंद करावी व तो कमांडंट, राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून, उत्तराखंड २४८ ००३. या पत्त्यावरती पाठवून देण्यात यावा. **(तसेच आवेदनपत्र आपल्याला प्राप्त होण्यासाठी आपला पूर्ण पत्ता पिनकोडसह, स्पीड पोस्ट पाकिटावर नमूद करावा.)** डिमांड ड्राफ्ट पाठविल्यानंतर आवेदनपत्र, माहितीपत्र व मागील १० वर्षांच्या प्रश्नपत्रिकांचा संच कमांडंट, राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून यांचेकडून स्पीड पोस्टाने आपणास आपण दिलेल्या पत्त्यावरती पाठविण्यात येतील.

परिपूर्ण भरलेली आवेदनपत्रे दि. ३० 'सप्टेंबर' २०२० पर्यंत मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे ४११ ००१ यांचेकडे पोहोचतील अशा प्रकारे स्पीड पोस्टाने पाठवावीत किंवा समक्ष येऊन जमा करावीत. **त्यानंतर आलेली आवेदनपत्रे कोणत्याही परिस्थितीत स्वीकारण्यात येणार नाहीत. (आवेदनपत्र (फॉर्म) कमांडंट RIMC, डेहराडून यांच्याकडून मागविण्याकरिता आपण www.rime.gov.in या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन पद्धतीने पैसे भरून फॉर्मची (आवेदनपत्राची) मागणी करू शकता.**

आवेदनपत्र दोन प्रतींत भरणे आवश्यक आहे व त्यासोबत जन्मतारखेच्या दाखल्याची प्रत, जातीच्या दाखल्याची (अनुसूचित जाती/जमातीसाठी) छायांकित एक प्रत. अधिवास दाखल्याची सत्यप्रत (Domicile Cerificate) जोडणे आवश्यक आहे. तसेच शाळेच्या बोनाफाईड सर्टिफिकेटची मूळ प्रत फोटोसह जोडणे आवश्यक आहे.

परीक्षेसाठी इंग्रजी, गणित आणि सामान्यज्ञान या तीन विषयांचे पेपर असतील. गणित व सामान्यज्ञान विषयांच्या प्रश्नपत्रिका इंग्रजी/हिंदी या भाषांत उपलब्ध होतील.

लेखी परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती मंगळवार दि. ६ एप्रिल २०२१ रोजी घेण्यात येतील.

**(तुकाराम सुपे)**
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे १.



२६ सप्टेंबर : ईश्वरचंद्र विद्यासागर जन्मदिन (१८२०)

## आवेदनपत्रासोबत लागणारी कागदपत्रे, सूचना व वेळापत्रक

१) आवेदनपत्र दोन प्रतींत भरणे आवश्यक आहे.

२) आवेदनपत्र भरताना विद्यार्थ्यांचे ४ फोटो आवश्यक आहे. त्यापैकी २ फोटो आवेदनपत्रावर चिटकवून त्या फोटो खाली विद्यार्थ्याने स्वाक्षरी करावी व दुसऱ्या २ फोटोंच्या पाठीमागे विद्यार्थ्याने स्वाक्षरी करून फोटो आवेदनपत्रासोबत जोडावे.

३) शाळेच्या बोनाफाईड सर्टिफिकेटवर फोटो लावून मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीसह साक्षांकित करून बोनाफाईड सोबत जोडावे.

४) नगरपालिका/ग्रामपंचायत/पंचायत समितीच्या विहित नमुन्यातील, विद्यार्थ्यांच्या जन्मतारखेच्या दाखल्याची एक साक्षांकित झेरॉक्स प्रत सोबत जोडावी.

५) अधिवासाच्या दाखल्याची (Domicile Certificate) झेरॉक्स प्रत मुख्याध्यापकांमार्फत किंवा राजपत्रित अधिकाऱ्यांमार्फत साक्षांकित (Attested) करून सोबत जोडावी.

६) सर्व बाबी पूर्ण न केल्यास आवेदनपत्र अपूर्ण समजण्यात येईल. असे अवेदनपत्र स्वीकारले जाणार नाही.

७) परिपूर्ण भरलेली आवेदनपत्रे दि. ३० सप्टेंबर २०२० पर्यंत मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे ४११ ००१ यांचेकडे पोहोचतील अशा प्रकारे स्पीड पोस्टाने पाठवावीत किंवा समक्ष येऊन जमा करावीत. त्यानंतर आलेली आवेदनपत्रे कोणत्याही परिस्थितीत स्वीकारण्यात येणार नाहीत.

८) दि. २० नोव्हेंबर २०२० पर्यंत प्रवेशपत्र प्राप्त न झाल्यास या कार्यालयाशी दूरध्वनीवरून संपर्क साधावा किंवा विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे www.mscepune.in या परिषदेच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येतील.

## राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून, प्रवेश पात्रता परीक्षा दि. १ व २ डिसेंबर २०२० वेळापत्रक

| दिनांक | वार | वेळ | विषय | गुण |
|---|---|---|---|---|
| ०१/१२/२०२० | मंगळवार | स. १०.०० ते १२.०० | इंग्रजी | १२५ |
| ०१/१२/२०२० | मंगळवार | दु. २.०० ते ३.३० | गणित | २०० |
| ०२/१२/२०२० | बुधवार | स. १०.०० ते ११.०० | सामान्यज्ञान | ७५ |

परीक्षेसाठी इंग्रजी, गणित आणि सामान्यज्ञान या तीन विषयांचे लेखी पेपर असतील, परीक्षार्थींना गणिताचा व सामान्यज्ञानाचा पेपर इंग्रजी अथवा हिंदीमध्ये लिहिता येईल. गणित व सामान्यज्ञान विषयांच्या प्रश्नपत्रिका इंग्रजी/हिंदी या भाषांत उपलब्ध होतील.

## जाहीर प्रकटन

सध्या देशात व राज्यात कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे लॉकडाऊन व सर्व शाळा बंद असल्यामुळे तसेच आवश्यक कागदपत्रे मिळण्यास विलंब होत असल्यामुळे उपरोक्त परिस्थितीचा विचार करून **राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून प्रवेश पात्रता परीक्षा** दिनांक १ व २ डिसेंबर २०२० साठी कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे कागदपत्रांशिवाय आवेदनपत्र भरण्यास सूट देण्यात आली आहे ते पुढीलप्रमाणे.

१) शाळेचे बोनाफाईड.

२) डोमिसाईल (अधिवास) प्रमाणपत्र.

३) आवेदनपत्रावरील मुख्याध्यापकांची स्वाक्षरी.

उपरोक्त अ. क्र. १ ते ३ मध्ये सूट देण्यात आली आहे. आवेदनपत्रासोबत उमेदवार (विद्यार्थ्याचे) जन्मप्रमाणपत्र आवश्यक आहे.

**(तुकाराम सुपे)**
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे १

**अधिक माहितीसाठी ०२०-२६१२३०६६/६७ या क्रमांकावर संपर्क करा किंवा www.mscepune.in या संकेतस्थळाला भेट द्या.**

## प्रिय संपादक ....

जुलै २०२० चा अंक डाऊनलोड करून pdf स्वरूपात वाचला. 'जीवन शिक्षण' मासिक म्हणजे माझ्यासारख्या शिक्षकांसाठी ज्ञानाच्या झऱ्यासारखे आहे. श्री. दिनकर पाटील सरांचे संपादकीय अतिशय मार्मिक व ज्ञानदायी असते. या अंकातील मा. विवेक कवठेकर यांच्या लेखातील 'स्वामी विवेकानंदांचे शिक्षण विचार' आजच्या शिक्षण पद्धतीसाठी अतिशय उपयोगी आहेत. कोरोना संकटकाळात शाळा बंद असली तरी शिक्षण सुरू आहे. उमेश खोसे यांची 'ऑनलाईन शिक्षण आणि ऑनलाईन निकाल' ही संकल्पना व कार्यवाही निश्चितच अभिनंदनीय आहे. विद्यार्थ्यांची आवड लक्षात घेऊन करिअरची निवड करण्याची संधी व ती विशिष्ट वयातच कशी मिळायला हवी याविषयी डॉ. रत्ना चौधरी यांनी केलेले विश्लेषण विद्यार्थ्यांसोबत शिक्षक व पालक यांनाही दिशा देणारे असे आहे. खरा शिक्षक विद्यार्थ्यांना विश्वदर्शन घडवितो याची प्रचिती मारुती देवेकर यांच्या 'शिष्यवृत्तीचा सोनाळी पॅटर्न' या लेखातून येते. यातील 'मी न माझा राहिलो' हा भाव प्रत्येक शिक्षकांना स्फूर्ती देणारा आहे. भारतासारख्या विविध भाषा असलेल्या देशात 'Multilingualism in English' किती महत्त्वाचे आहे, याविषयी हर्षा चव्हाण यांचे विचार विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाकडे आकर्षित करून या विषयाची गोडी लावण्यासाठी अतिशय उपयोगी आहेत.

'जीवन शिक्षण' मासिकातील सर्वच लेख विद्यार्थी, शिक्षक, पालक या त्रिसूत्रीला अतिशय मोलाचे व मार्गदर्शक असतात. ज्ञानाचा हा झरा असाच अखंड वाहता रहावा ही शुभेच्छा...

**बंडू शालिक खोब्रागडे**

जि. प. प्राथ. शा. येहळेगाव, ता. कळमनुरी, जि. हिंगोली.

'जीवन शिक्षण' चा ऑगस्ट २०२० चा अंक खूप आवडला. राज्याच्या शालेय शिक्षण मंत्री मा. प्रा. वर्षाताई गायकवाड यांची संदीप वाक्‌चौरे यांनी घेतलेली मुलाखत विशेष आवडली. भावी पिढीला सुरक्षित ठेवत, शिक्षण सुरू ठेवण्यासाठी शासन स्तरावरून केले जाणारे प्रयत्न व उपाययोजना यांची माहिती मिळाली. ऑनलाईन की ऑफलाईन असा शब्दच्छल करीत बसण्यापेक्षा शिक्षण सुरू ठेवण्याला दिलेले प्राधान्य खूप महत्त्वाचे वाटले. दिक्षा ॲपचा प्रभावीपणे होणारा वापर, रेडिओ, दूरचित्रवाणी, मोबाईल यांसह विविध तंत्रांचा वापर व राज्याच्या कानाकोपऱ्यांतून शिक्षणासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांच्या विश्वाची सफर घडवून आणणारा हा अंक आहे. रवींद्र जंगम जि. प. केंद्र शाळा निंबाळकर, जि. सातारा यांनी कोरोना संबंधित दिलेली घोषवाक्ये उपयुक्त वाटली. शाळा बंद असल्या, तरी शिक्षण सुरू आहे हे साधार दिसून येते. इतर शिक्षकांनाही यातून प्रेरणा व मार्गदर्शक दिशा मिळते. फक्त चार भिंतीच्या आत चालते तेवढेच शिक्षण नसून बिनभिंतीच्या शाळेतही मुलांचे शिक्षण होत आहे. मुलांना पालकांचा सहवास मिळत आहे, नातेसंबंध दृढ होत आहेत, पण शाळा बंद असल्याने आणि विद्यार्थी सहवास नसल्याने एक प्रकारची अस्वस्थता शिक्षकांमध्ये दिसून येते. ती अस्वस्थता कमी करण्यासाठी विविध पर्यायांची ओळख करून देणारा, नवशिक्षणाची दारे खुली करणारा हा अंक संग्रही ठेवावा असा आहे.

**कृष्णा खंडू कुदळे,**


जि. प. शाळा कोकणे वस्ती, ता. दौंड, जि. पुणे.




# प्रत्यक्ष प्रयोगातून विज्ञान व गणिताचे मजेदार शिक्षण

## पाणी कपातच का राहते?

केंद्रोत्सारी बल (Centrifugal force)








साहित्य : पारदर्शक प्लॅस्टिकचा कप/ग्लास, रंगीत पाणी, दोरा, कात्री, सुई.





कपाच्या काठावर तीन सारख्या अंतरांवर खुणा करा. या प्रयोगासाठी प्लॅस्टिकची बाटली अर्धी कापूनही वापरू शकता.





सुईच्या मदतीने तीन दोरे तयार झालेल्या छिद्रांमधून ओवून घ्या व ते तीनही दोरे एकत्र बांधा.





आता कप रंगीत पाण्याने साधारण अर्धा भरा.





तीनही दोरे बांधलेल्या जोडावर एक फूटभर दोरा जादा बांधून दोरा लांब करा. चित्रात दाखविल्याप्रमाणे कप दोऱ्याने हातात धरा. हा प्रयोग बाहेर मोकळ्या जागी करा.




आता कपाला तीन चार वेळा दोन्ही बाजूंना दोलने देऊन गती आल्यावर तो झटकन गोल फिरवा.




तुम्हांला असे दिसेल की, कप गोल फिरविला तरी पाणी बाहेर सांडत नाही. अगदी कप उलटा केल्यावर सुद्धा पाणी खाली पडत नाही.




पाणी असलेला कप जेव्हा आपण फिरवितो, तेव्हा तयार झालेले केंद्रोत्सारी बल कपातील पाण्याला बाहेरच्या बाजूस (कपाच्या तळाकडे) ढकलते म्हणून कप उलटा झाला तरी पाणी बाहेर पडत नाही.

**वैज्ञानिक कारण :** केंद्रोत्सारी बल नेहमी वर्तुळाकार गतीमध्ये फिरत असलेल्या वस्तूला वर्तुळाच्या केंद्रापासून त्रिज्येच्या रेषेत दूर ढकलते. त्यामुळे पाणी वर्तुळाकार फिरत असलेल्या कपाच्या तळाकडे ढकलले जाते आणि कप अगदी उलटा झाला तरी खाली पाणी खाली पडत नाही. कपाची वर्तुळाकार गती कमी केली तर मात्र पाणी खाली पडेल. या प्रयोगामध्ये जेव्हा पाणी भरलेल्या कपाची वर्तुळाकार गती जास्त असते तेव्हा त्या कपावर केंद्रोत्सारी बल जास्त काम करते. गती कमी झाल्यावर केंद्रोत्सारी बल सुद्धा कमी होते. कपावरील केंद्रोत्सारी बल जेव्हा गुरुत्व बलापेक्षा जास्त असते तेव्हा पाणी खाली पडत नाही. केंद्रोत्सारी बलाची मात्रा जेव्हा गुरुत्व बलाच्या मात्रेपेक्षा कमी होईल तेव्हा मात्र पाणी कपातून खाली पडेल.

निर्मिती : **सायन्स ॲक्टिव्हिटी सेंटर, आयसर, पुणे.**

'जीवन शिक्षण' हे मासिक मालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र यांच्यासाठी मुद्रक व प्रकाशक श्री. दिनकर पाटील यांनी रुना ग्राफिक्स, त्रिमूर्ती हॉस्पिटलमागे, वडगाव बु.।।, सिंहगड रोड, पुणे–४१ येथे छापून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र ७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे – ४११०३० येथे प्रसिद्ध केले.

Date of Publication 3 September 2020
Jeevan Shikshan Magazine is posted
on 3rd and 4th of September 2020
at Pune PSO, G.P.O. Pin 411 001.

**'Registered'**

Reg. No. RNI - 14563/57
Post Registration No.: PCW/063/2018-2020
Licensed to post without prepayment postage No.: **WPP - 28**

# राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र

## जीवन शिक्षण प्रकाशन विभाग

## विक्रीसाठी प्रकाशने

| अ. क्र. | पुस्तकाचे नाव | किंमत रुपये | पोस्टेज खर्च |
|---|---|---|---|
| १. | अधिकारी कर्मचारी मार्गदर्शिका | रु. १३०/- | ३०/- |
| २. | माझा वेगळा उपक्रम | रु. ४०/- | ३०/- |
| ३. | आठवणीतील शाळा | रु. ७०/- | ३०/- |
| ४. | राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ | रु. ९०/- | ३०/- |
| ५. | टर्निंग पॉईंट | रु. ५०/- | २५/- |
| ६. | प्रश्नमंजूषा | रु. ४०/- | ३०/- |
| ७. | गीतावली पुस्तक | रु. ७०/- | ३०/- |
| ८. | गीतावली सी. डी. | रु. ५०/- | -- |
| ९. | १ ते ८ अभ्यासक्रम सी. डी. | रु. ५०/- | -- |
| १०. | हितगुज | रु. ४०/- | २५/- |
| ११. | भाषिक खेळ | रु. १००/- | ३०/- |
| १२. | आर. टी. ई. २००९ | रु. ६०/- | ३०/- |
| १३. | जागर जाणिवांचा | रु. ४०/- | २५/- |

वरील पुस्तके प्रकाशन विभागाकडे उपलब्ध आहेत.

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**संपादक, जीवन शिक्षण**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
दूरध्वनी : ०२०-२४४८८३८२
फॅक्स नं.: ०२०-२४४७७०९०.
**ई मेल :** jeevanshikshan@maa.ac.in

प्रति ____________________